.

Rakshit Madan Bagde

**To cite this version:**

Rakshit Madan Bagde. . . 2019. hprints-03336687

**HAL Id: hprints-03336687**

**https://hal-hprints.archives-ouvertes.fr/hprints-03336687v1**

Submitted on 7 Sep 2021

**HAL** is a multi-disciplinary open access archive for the deposit and dissemination of scientific research documents, whether they are published or not. The documents may come from teaching and research institutions in France or abroad, or from public or private research centers.

L'archive ouverte pluridisciplinaire **HAL**, est destinée au dépôt et à la diffusion de documents scientifiques de niveau recherche, publiés ou non, émanant des établissements d'enseignement et de recherche français ou étrangers, des laboratoires publics ou privés.

# मुक्त आर्थिक धोरण आणि डॉ. आंबेडकरांचे तत्वज्ञान



डॉ. रक्षित मदन बागडे

# मुक्त आर्थिक धोरणविषयक डॉ.आंबेडकरांचे तत्वज्ञान

**डॉ. रक्षित मदन बागडे**

लोटस् ॲन्ड कोब्रा पब्लिशिंग हाऊस
नागपूर–17

Mukt Arthik Dhoranvishayak Dr. Ambedkaranche Tatvadhnyan

**मुक्त आर्थिक धोरणविषयक डॉ.आंबेडकरांचे तत्वज्ञान**

Dr. Rakshit Madan Bagde

**डॉ. रक्षित मदन बागडे**

© लेखक

**प्रकाशक**

Lotus & Cobra Publishing House

C/o. Ashwajit Patil, 425, New Khadan, Lashkaribagh, Nagpur-17

M : 9096924808 / 9405238458

e-mail : lotusandcobraph@gmail.com

प्रथम आवृत्ती – 2019

ISBN – 978-93-87250-26-0

---

Author is responsible for contents and corrections.

---

***DTP & Layout***

Kalatmak Printing & Binding Bureau

425, New Khadan, Lashkaribagh, Nagpur-17

M : 9373178748, e-mail : p28ashwa@gmail.com

***Cover Design***

Nirmal Computers, Indroa, Nagpur-14

***Printed at :***

Kalatmak Printing & Binding Bureau

425, New Khadan, Lashkaribagh, Nagpur-17

M : 9373178748, e-mail : p28ashwa@gmail.com



‘‘आद्य समाजसुधारक
महात्मा ज्योतीराव फुले
आणि
विद्येची देवता सावित्रीबाई फुले
यांना समर्पीत.’’

# ऋणनिर्देश

**"मुक्त आर्थिक धोरणविषयक डॉ. आंबेडकरांचे तत्वज्ञान"** या पुस्तकाची प्रथम आवृत्ती सुज्ञ वाचकांच्या हाती देतांना मला अतिशय आनंद होत आहे. कोणतेही कार्य असो, एकटा व्यक्ती ते कार्य चांगल्या प्रकारे पूर्ण करू शकत नाही. तर कार्य उत्तम होण्यासाठी अनेकांचे सहकार्य, मार्गदर्शन, सदिच्छा, प्रेरणा आणि आर्शिवाद आवश्यक असतो. त्यानुसार माझ्या लेखनाच्या कार्यास अनेकांची मदत आणि सहकार्य लाभल्यामुळे मी हे कार्य वेळेवर पूर्ण करू शकलो. आणि त्यामुळेच अशा सर्व आदरणीय मान्यवरांचे आभार आणि ऋणनिर्देश व्यक्त करणे मी माझे आद्य कर्तव्य मानतो.

पुस्तक निर्मितीचे मुळ प्रेरणास्थान स्व. डॉ. एस.पी. कुलकर्णी यांचा सदैव ऋणी राहिल. सदर विषयाची मांडणी करण्यासाठी माझे मार्गदर्शक डॉ. सत्यप्रिय ह. इंदुरवाडे, सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, रा. तु. म. नागपूर, विद्यापीठ, नागपूर. यांनी मला वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन आणि मदत केली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

प्रस्तुत लेखन कार्य पूर्ण करण्यासाठी अनेक मान्यवर विचारवंतांनी केलेल्या अभ्यासाचा मुक्तपणे उपयोग करण्यात आलेला आहे. त्याच प्रमाणे, प्रा. डॉ. विजय बन्सोड तसेच प्रा. डॉ. स्नेहा देशपांडे अर्थशास्त्र विभाग प्रमुख, रा. तु. म. नागपूर, विद्यापीठ, नागपूर. तसेच अर्थशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापकांनी सुद्धा अभ्यास पूर्ण करण्याकरीता मदत केली, मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

प्रस्तुत लेखन पूर्ण करण्याकरीता माझे आई–वडील आणि माझी अर्धांगिणी सौ. समता यांच्या प्रेरनेतुन हे लेखन पूर्ण करू शकलो. तसेच माझे मित्र प्रा. राहूल मेश्राम यांनी लेखानाकरीता मदत केली त्यामूळे मी त्यांचा आभारी आहे. प्रकाशकांचेही आभार व्यक्त करतो. अभ्यास परीपूर्ण आहे असा माझा मुळीच दावा नाही. भविष्यात कुणीतरी हा अभ्यास पुढे नेतील हिच अपेक्षा.

ठिकाण : नागपूर

प्रा. डॉ. रक्षित मदन बागडे

# अनुक्रमणिका

ऋणनिर्देष

प्रस्तावना

मुक्त आर्थिक धोरणाचा अर्थव्यवस्थेवरील प्रभाव

मुक्त आर्थिक धोरणामुळे निर्माण होणाऱ्या समस्या

डॉ.आंबेडकरांचा आर्थिक दृष्टिकोन

# प्रस्तावना

साडेतीनशे वर्षाच्या गुलामगिरीतून मुक्त झालेल्या देशातील बहुजन समाजाने कोणती स्वप्नं पाहिली असतील? परंपरागत सामाजिक आणि आर्थिक विषमतेच्या बेड्या तोडण्याचे ध्येय मात्र नक्कीच होते. कारण त्याचे प्रतिबिंब राज्यघटनेत उमटले आहे. सामाजिक आणि आर्थिक समतेसंदर्भात घटना समितीत भाषण करतांना डॉ.आंबेडकरांनी इशारा दिला होता की, ''राजकीय लोकशाही यशस्वी करण्यासाठी केवळ सामाजिक लोकशाही महत्त्वाची नाही तर आर्थिक लोकशाहीचाही अंगिकार करणे तेवढेच महत्त्वाचे आहे'' 15 ऑगस्ट 1947 साली भारताला स्वातंत्र्य मिळाले राज्यघटना स्वीकारण्याच्या अगोदर भारताने आपल्या औद्योगिक विकासाला 6 एप्रिल 1948 चे औद्योगिक धोरणाने सुरुवात केली होती. परंतु खऱ्या अर्थाने औद्योगिक आणि आर्थिक विकासाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली ती 26 जानेवारी 1950 ला स्वीकारलेल्या राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे!

भारताच्या राष्ट्रीय सरकारने सन 1948 साली औद्योगिक धोरणाची आखणी केली. या धोरणानुसार मिश्र अर्थव्यवस्था स्थापन करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार काही विशिष्ट मुलभूत उद्योगांचा विकास करण्याचे काम सरकारने करण्याचे ठरविले व खाजगी क्षेत्राला आपल्या विकासाचा मार्ग चोखाळण्याचे स्वातंत्र्य दिले. देशाने कल्याणकारी राज्याची संकल्पना साकार करण्यासाठी आणि राज्य समाजवादाच्या तत्त्वाने सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी राष्ट्राने भारताच्या संविधानात याची तरतूद केली.[1]

जून 1991 मध्ये श्री. नरसिंहराव सरकार सत्तेवर आल्याबरोबर नवीन आर्थिक धोरणाची घोषणा करण्यात आली. 1991 मध्ये भारताचा विदेशी विनिमय राखीव निधी अत्यंत खालावून आयातींकरिता केवळ दोन आठवडे पुरेल एवढाच म्हणजे 2.2 बिलियन डॉलर्स झाला. देशातील चलनस्फीती 8.4 टक्के व चालू खात्यातील तूट 9.9 बिलियन डॉलर्स एवढी होती.

परिस्थितीवर सुधारणा म्हणून ज्या नवीन आर्थिक सुधारणांची कास धरण्यात आली त्यांना 'भारताची नवीन आर्थिक निती' असे संबोधण्यात येते. यात वित्तीय तूट कमी करणे, चालू खात्यातील तूट कमी करणे, सरकारी खर्चात कपात करणे, आर्थिक सहाय्याने विवेकीकरण करणे, स्फीती आटोक्यात आणणे. दारिद्र्याचे निर्मूलन करणे व सामाजिक न्याय प्रस्थापित करणे ह्या सर्वांचा यात समावेश करण्यात आला. ह्या नवीन आर्थिक धोरणाचे मुलभूत उद्दिष्ट म्हणजे भारतीयांच्या जीवन स्तरात गुणात्मक व स्थिर राहणारा बदल घडवून आणणे हे होते.[2]

मुक्त आर्थिक धोरण ही सुरुवातीला वाटत होती तेवढी एकजिनसी प्रक्रिया नाही हे आता अधिकाधिक स्पष्ट होत आहे. जागतिकीकरण हे मुक्त आर्थिक धोरणाचाच एक भाग होय. त्यामुळे जागतिकीकरण आणि जग जवळ येणे या दोन्ही गोष्टी एकच नव्हेत हे आता स्पष्ट झाले आहे.

माणसाला ओढ असते ती प्रथम गाव, समाजाची नंतर राज्य आणि राष्ट्र. मुक्त आर्थिक धोरणामुळे जग जवळ आले असते तर साऱ्या विश्व समाजाबद्दल तीच आपुलकी वाटली असती. पिडितांसाठी सहानुभूती जागली असती असे घडले नाही म्हणूनच जग जवळ आले नाही. आपुलकीने, सहभावनेने बांधले नाही, तर केवळ व्यापार व्यवहाराचे, नफ्यातोट्याचे आणि मूठभर राष्ट्रांच्या हितसंबंधाचे जाळे जगभर पसरले गेले. जे मुक्त धोरणाच्या नावाने चालले आहे. याचे कारण ज्या बलिष्ट अर्थसत्तांनी ते घडवून आणले आहे त्यांना विरोध करण्याची हिंमत अन्य इतर राष्ट्रांत राहिलेली नाही.[3]

जागतिकीकरणाचे खरे रूप आता दिसू लागले आहे. गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी रुंदावत आहे. नवनव्या विषमता जन्माला येत आहेत. लवकरच "Man to Meterial" असा व्यापक आणि विपरित परिणाम पाहायला मिळणार आहे. 'जो सक्षम असेल तोच जगेल' असे सांगणारी ही व्यवस्था गरिबांचे अधिक शोषण करणारी त्याला अस्तित्वहीन बनवणारी आहे.

**अ) जागतिकीकरणाचा अर्थ :**

भारतात सन 1991 पासून जागतिकीकरणाला सुरुवात झाली. परंतु 1995 पासून जागतिकीकरणाचा वेग वाढविण्यात आला आहे. अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण म्हणजे स्पर्धेच्या माध्यमाद्वारे देशांतर्गत किंमतीचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील किंमतीशी समानीकरण करणे होय आणि ह्याकरिता साधनांचा मुक्तपणे संचार होऊ देणे होय.

जागतिक बँकेने जागतिकीकरणाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे -

1) उपभोग्य वस्तूसह सर्व वस्तुंच्या आयातीवरील निर्बंध कमी करणे.
2) आयात दर कमी पातळीवर आणणे.
3) सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण करणे.[4]

म्हणजेच 'जागतिकीकरण एक स्पर्धा व नवे तंत्रज्ञान यातून उत्पादकता व उत्पादन वाढविणे होय.'

भारतीय अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणात -

1) उपभोग्य वस्तुंच्या आयातीवरील निर्बंध उठविणे.
2) जकात प्रशुल्क कमी करणे.
3) विदेशी गुंतवणुकीला पुर्ण मुभा देणे.
4) रूपया परिवर्तनशील करणे.
5) अधिकोष व विमा क्षेत्र खुले करणे.

इ. बाबींचा समावेश होतो.

समय, अंतर व मूल्य ह्या तीन महत्त्वाच्या आयामाच्या दृष्टिकोनातून जागतिकीकरणाचा विचार केला जातो.[5]

जागतिकीकरणाचे समर्थन करणारे जागतिकीकरणाची व्याख्या अशी करतात-

''जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणी, शासन, समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व क्षेत्रातून होत राहणारे रूपांतर होय.''

जागतिकीकरणाला समर्थन करणारे खालील व्याख्यान करतात -

**1) एडवर्डस्** अर्थशास्त्रज्ञाच्या मते, ''व्यापाराच्या उदारीकरणामुळे वर्धी उत्पत्ती अंमलात येऊन अर्थव्यवस्थेत उच्च दर राहू शकतो.''

2) **के. थिरूवेंकटचारी** - ''व्यापारी उदारीकरण व त्यासह येणारे जागतिकीकरण ह्यामुळे उत्पन्न वाटणीतील विषमता कमी होते.''

3) **विश्वजीत चॅटर्जी** - ''नवीन आर्थिक उपाययोजना भारतीय अर्थव्यवस्थेतील दोष व अस्थिरता हटविण्याकरिता अत्यावश्यक आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात प्रतिष्ठा वाढेल.''

4) **के. एस. कृष्णचारी** यांच्या नुसार -

अ) भारतातील स्वदेशी उत्पादकता अधिक कार्यक्षम होऊन उत्पादन व्यय किमान पातळीवर आणू शकतात.

ब) किमान व्यय व मुक्त आयात यामुळे भारताची निर्यातक्षमता वाढू शकते.

क) विदेशी गुंतवणूकीला मुक्तद्वार असल्यामुळे आधुनिक ज्ञान व तंत्रज्ञानाचे भारतात आगमन होऊन भारतीय अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते.[6]

अर्थशास्त्रज्ञ, सामाजिक विचारवंत, राजकारणी, भारतातील व भारताबाहेरील बरेच लोक जागतिकीकरणावर सपाटून टिका करतात.

**1) लॉरेंस समर** (विश्व बॅंकेचे प्रमुख) यांच्या मते - ''मोठ्या प्रमाणात प्रदूषण निर्माण करणारे व त्रासदायक कारखान्यांचे स्थानांतरण तिसऱ्या जगातील गरीब देशामध्ये करावे अशी दुष्ट प्रवृत्ती जागतिकीकरणाच्या माध्यमातून होत आहे.''

2) Alenjandro व Halleiner - ''नाणे निधी व विश्व बॅंक ह्यांनी सांगितलेल्या उपाययोजनांनी विकसनशील देशांच्या समस्या सुटणार नाहीत.''

3) **के. सी. रेड्डी ह्यांच्या मते,** ''जागतिकीकरणामुळे तिसऱ्या जगातील देशांच्या जीवनमानात सुधारणा होण्याऐवजी घसरण झाली आहे. कारण विकसित देशांनी ह्याबाबत अवलंबिलेले धोरण हे समानता व रोजगार वृद्धी ह्यांना अनुकूल नाही.''

4) सुकुमार बसू जागतिकीकरणावर पुढील कारणांमुळे टिका करतात

अ) कर्जाचा बोझा वाढेल.

ब) शोधन शेषाची प्रतिकूलता वाढेल.

क) आयात होणाऱ्या आदानांची व भांडवली वस्तुंची किंमत वाढेल.
ड) निवडक लोकांसाठी सुखसोयी निर्माण होतील.
इ) गरिबीत वाढ होईल.
उ) आर्थिक सार्वभौमत्व कमी होईल.[7]

वरील सर्व मतांचा वस्तुनिष्ठ विचार केल्यास असे म्हणता येईल की, माणुसकीचा गहिवर आणणारे, विकासाला चालना देणारे, नवीन युगाची सुरुवात करणारे, क्रांतिकारक, भव्य, आपल्या अर्थव्यवस्थेतील सर्व समस्या सोडविण्याचा रामबाण उपाय म्हणून जागतिकीकरणातील नवीन आर्थिक धोरणांचा उदोउदो करण्यात येत असला तरी नवीन आर्थिक धोरणाच्या यशस्वीतेची खात्री नाही.

## ९) जागतिकीकरणाचे टप्पे :

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत पाच टप्प्यांचा समावेश होतो. त्यात 1) उदारीकरण 2) शिथिलीकरण 3) खाजगीकरण 4) बाजारीकरण 5) उद्योगांवर मक्तेदारी यांचा समावेश होतो.

## I) उदारीकरण :

जग हे एक मोठे खेडे आहे अशी उदारीकरणाची व्यापक संकल्पना आहे. त्यात आयाती आणि निर्यातीवर कोणतेही बंधने नसतात. अर्थव्यवस्थेतील कोणत्याही क्षेत्रात उत्पादन, गुंतवणूक व वितरण यासाठी मुक्त प्रवेश आणि कोणत्याही उद्योगातून मुक्तपणे बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य होय.[8]

भारताने अमलात आणलेल्या उदारीकरणाच्या धोरणात खालील बाबींचा समावेश होतो-

1) परवाना मुक्त धोरण :

संरक्षणाच्या दृष्टीने किंवा राष्ट्राच्या डावपेचाचा भाग म्हणून आवश्यक उद्योग वगळता सर्व उद्योगात विना परवाना प्रवेश करण्याची विदेशी व स्वदेशी भांडवलदारांना मुभा दिली.

2) विदेशी गुंतवणूकदारांना मुक्त प्रवेश.

3) कंपन्या व गुंतवणूकदारांना 51% पेक्षा जास्त गुंतवणूक करण्याची मुभा.
4) मक्तेदारी उद्योगातील गुंतवणूकीची कमालमर्यादा रद्द करण्यात आली.
5) औद्योगिक कंपन्यांना आपला आकार लहान-मोठा करण्याचे अधिकार दिले.
6) भारतातील पायाभूत उद्योग - वीज, रस्ते, पूल व बंदर उद्योग विदेशी गुंतवणूक दारांकरिता खुले करण्यात आले.
7) आयात निर्यातीस स्वातंत्र्य दिले.
8) नरसिंह समितीच्या वित्तिय क्षेत्रातील सर्वच्या सर्व शिफारशी स्वीकारण्यात आल्या ज्या उदारीकरणावर भर देणाऱ्या होत्या.
9) कृषी क्षेत्राचे उदारीकरण करण्यात आले.[9]

## II) खाजगीकरण :

खाजगीकरण ही सार्वजनिक उपक्रमामध्ये खाजगी मालकी किंवा कारभार यांचा समावेश करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया आहे. नवीन आर्थिक धोरणात खाजगीकरणाला महत्त्वाचे स्थान आहे. ''सरकारी मालकीचे उद्योग खाजगी मालकांकडे सोपविणे म्हणजे खाजगीकरण होय.'' मिश्र अर्थव्यवस्थेत सरकार मालकीचे क्षेत्र व खाजगी क्षेत्र असे दोन्ही प्रकार असतात. आता पूर्वीचे खाजगी क्षेत्र राहणारच व सरकार मालकीच्या उद्योग व्यवसायातून आपले भांडवल काढून घेणार अशी मुक्त बाजारव्यवस्था देशात आली आहे.[10]

पिटर डूकरचे पुस्तक प्रसिद्ध झाल्यापासून केवळ आठ वर्षात इंग्लंडमध्ये पंतप्रधान मार्गारेट थॅचर ह्यांच्या सरकारने खाजगीकरणाला सुरुवात केली. 1986 मध्ये फ्रांसमध्ये खाजगीकरणाला सुरुवात झाली. कम्युनिस्ट चीन देशातही काही क्षेत्रांचे खाजगीकरण करण्यात आले. भारतामध्ये 1991 चे धोरणात खाजगीकरणाला सुरुवात झाली. भारतातील हा प्रयोग एक प्रकारची संक्रमण अवस्था आहे. परिवर्तन नव्हे.[11]

खाजगीकरणाच्या तीन पद्धती आहेत -

**अ) मालकी हक्क -**

मालकी हक्कासंदर्भात खाजगीकरण चार पद्धतीने राबविले जाते.

i) पूर्णपणे विराष्ट्रीकरण - यात सार्वजनिक उपक्रमाचे पूर्णपणे हस्तांतरण खाजगी व्यक्तीकडे किंवा संस्थेकडे केले जाते. यात शासनाचा कोणताही हस्तक्षेप नसतो.

ii) संयुक्त उपक्रम - यानुसार सार्वजनिक उपक्रमात काही प्रमाणात खाजगी मालकी मान्य केली जाते. हे प्रमाण साधारणतः 25% ते 50% किंवा त्यापेक्षा जास्त असू शकते.

iii) मोडीत काढणे - यात सार्वजनिक उपक्रमाची मालमत्ता खाजगी व्यक्तींना विकली जाते.

iv) व्यवस्थापन विक्री - सार्वजनिक क्षेत्राची मालमत्ता कर्मचाऱ्यांना विकली जाते त्यासाठी बँकेद्वारे कर्जपुरवठा केला जातो.

**ब) संघटनात्मक -**

यामध्ये सार्वजनिक उपक्रमाचे संघटनात्मक नियंत्रण सार्वजनिक सत्तेकडून केले जाते. यामध्ये तीन प्रकारांचा समावेश होतो.

1) स्थानिय संस्था
2) भाडेपट्टीचे देणे
3) पुनर्रचना

**क) कार्यात्मक -**

सार्वजनिक क्षेत्रात व्यापारी तत्त्वांचा अवलंब केला जातो. उत्पादकता वाढीसाठी संबंधित उपक्रमास निर्णयाच्या बाबतीत स्वायतत्ता दिली जाते. भांडवल उभारणीसाठी भांडवल बाजारात उतरण्याची परवानगी दिली जाते.[12]

या सर्व बाबींचा एकच अर्थ निघतो तो म्हणजे शासनाचे नियंत्रण कमी करणे होय. खाजगीकरणाची प्रक्रिया देशाची व देशातील समाजाची बांधिलकी नाकारून फक्त उत्पादकतेला महत्त्व देत असते.

### III) शिथिलीकरण :

शिथिलीकरण म्हणजे नियंत्रण हटविण्याचे धोरण होय. याचा परिणाम परदेशी कंपन्या त्यांच्याकडे न खपणारा माल इथे आणून विकतात. परदेशी कंपन्या सुटे भाग भारतात आणून ते कमी श्रमिकांकडून जोडून घेतात त्यामुळे उत्पादन वाढते पण रोजगार वाढत नाही.[1]

### IV) बाजारीकरण :

बाजारीकरणाच्या प्रक्रियेत सर्व आर्थिक निर्णय आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेनी ठरवून दिलेल्या माणकानुसार करण्यात येतात. यात भारत सरकारला कोणतेही हस्तकक्षेपाचे अधिकार राहणार नाही. देशातील सत्ताधारी व अधिकारी शिपायांची भूमिका वठवेल व जनता मात्र गुलामगिरीत अडकून आर्थिक स्वातंत्र्य गमविल.[14]

### V) उद्योगावर मक्तेदारी :

जागतिक व्यापार संघटनेच्या माध्यमातून उद्योगांवर मक्तेदारी प्रस्थापित करणे. ज्या देशात स्वस्त माल मिळतो त्या देशातून तो घेणे व ज्या देशात जास्त भाव मिळतो तेथे विकणे म्हणजे उद्योगांवरील मक्तेदारी होय.[15]

जागतिकीकरणाचे स्वरूप अतिशय विशाल व अक्राळविक्राळ आहे. या धोरणांचा देशावर अतिशय विपरित परिणाम होणार आहे.

## २) जागतिकीकरणाची संरचना :

जागतिकीकरण लादण्यात जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेची मुख्य भूमिका आहे. दुसऱ्या महायुद्धात युरोपियन देश क्षतिग्रस्त झाल्याने तेथील अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होऊ लागला. सन 1944 साली ब्रेटनवुड गावात 44 देशातील प्रतिनिधींचे एक संमेलन झाले. त्यात जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थांची स्थापना करण्यास मान्यता दिली. त्यात भारताचाही समावेश होता.

या ठरावानुसार नवनिर्माण जागतिक बँकेने आपले उद्देश जाहीर केले. त्यात खालील बाबींचा समावेश होता -

1) उद्ध्वस्त अर्थव्यवस्थेची घडी बसवून विकास करणे.

2) खाजगी भांडवल गुंतवणूकीकरिता उपलब्ध करून देणे.

3) देशांच्या आर्थिक विकासातील विषमता कमी करणे.

4) युद्ध सामग्री कारखान्यांचे उपभोग्य वस्तू निर्मिती कारखान्यात रूपांतर करणे.[16]

जागतिक बँकेच्या कराराप्रमाणे सर्व राष्ट्रांसाठी सभासदत्व खुले ठेवण्यात आले आहे. ह्या सभासदत्वाची मुख्य अट म्हणजे जो देश आंतरराष्ट्रीय मुद्राकोषाचा सभासद असेल तोच विश्व अधिकोषाचा सभासद होऊ शकतो. दुसरी अट म्हणजे सभासद होऊ इच्छिणाऱ्या देशाने अधिकोषाच्या नियमांचे पालन करण्याचे अभिवचन दिले पाहिजे.

जागतिक अधिकोषाची प्रशासकीय रचना लोकशाहीवादी नाही. जो देश जास्त पैसे देतो त्यांच्या बाजूने मतदानाची बाजू जड होते.

विश्व बँकेचे चार प्रकार आहेत. त्यात -

i) द इंटरनॅशनल बँक फार रिकंस्ट्रक्शन एन्ड डेव्हलपमेंट (स्थापना 1944) IBRD

ii) द इंटरनॅशनल डेव्हलपमेंट असोशिएशन (स्थापना 1960) IDA

iii) द इंटरनॅशनल फायनांस कारपोरेशन (स्थापना 1956) IFO

iv) मल्टीलेटरल इन्वेस्टमेंट गारंटी एजेंशी (स्थापना 1988) MIGA[17]

**गॅट (GATT) :**

सन 1947 मध्ये जिनेव्हा येथे एक जागतिक स्तरावरील संमेलन भरविण्यात आले व त्यानुसार एक सामान्य करार करण्यात आला त्याला गॅट **GATT** असे म्हणतात.

गॅटचे मुख्य प्रयोजन म्हणजे प्रशुल्क दर शक्य तितके कमी करून व्यापार विकासात येणारे अडथळे दूर सारून लाभ

अर्जित करणे आहे. त्यासाठी काही उद्दिष्टांचे निर्धारण करण्यात आलेले आहे. त्यात -

1) सभासद देशातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणणे.

2) अर्थव्यवस्थेचे पूर्ण रोजगारीच्या अवस्थेकडे वाटचाल करणे.

3) वास्तविक उत्पन्न व प्रभावी मागणीत वाढ करणे.

4) आंतरराष्ट्रीय व्यापार व उत्पादनात वाढ करणे.

5) उपलब्ध साधनांचा युक्ततम वापर करणे.[18]

गॅटच्या आठव्या फेरीत 20 सप्टेंबर 1986 रोजी उरुग्वे येथे एक विवादास्पद चर्चा झाली. यात एकूण 120 देशांनी भाग घेतला होता. गॅटच्या या चर्चेत तीन नव्या क्षेत्रांची भर पडली. 1) व्यापार संबंधित बौद्धिक संपत्ती अधिकार 2) व्यापार संबंधी विनियोग उपाय 3) सेवा क्षेत्राचा व्यापारात समावेश या तीन मुद्यावर एकमत न झाल्याने चर्चा खोळंबली.[19]

याच चर्चेचा आधार घेत 'आर्थर डंकेल' ह्यांनी एक 436 पानांचा अहवाल 20 डिसेंबर 1999 रोजी सादर केला. हाच अहवाल चर्चा व वादविवादाचा विषय झाला. तो पुढीलप्रमाणे-

अ) डंकेल प्रस्तावाची रचना -

नाव : बहुराष्ट्रीय व्यापार वाटाघाटी

1) नौभरणपुर्व परीक्षण
2) मूल्य अवपात विरोध
3) व्यापारातील तांत्रिक विरोध
4) आयात परवाने प्रक्रिया
5) अर्थसहाय्य व प्रतिशुल्क
6) शेती
7) गुंतवणूक व्यापाराशी संबंधित उपाय
8) कापड व वस्त्रे
9) वाद निराकरण नियम
10) सार्वत्रिक संस्थेची नियमावली व कार्यप्रणाली
11) सेवांचा व्यापार - व्यापाराशी संबंधित बौद्धिक संपत्ती अधिकार

12) बहुपक्षीय व्यापार संघटनेची स्थापना[20]

ब) डंकेल प्रस्तावाची वैशिष्ट्ये -

1) जागतिकीकरण
2) कृषी व औद्योगिक व्यापार मोकळे
3) मागताक्षणी परवाने
4) अर्थसहाय्य
5) देशांतर्गत व देशाबाहेरील वाहतूक दरातील सहाय्य थांबविने
6) स्थानिक वस्तुंचे अनुदान बंद
7) सात वर्षात अर्थसहाय्य योजना संपुष्टात आणणे
8) मुक्त व्यापार -

अ) शेतीला दीर्घकालीन संरक्षण कमी करणे.
ब) अंतर्गत अर्थसहाय्य कमी करणे.
क) कृषी उत्पादनाची स्पर्धात्मकता, निर्यात वाढविणे.
ड) स्वच्छता आणि वनस्पती जीवनाचे संरक्षण.
इ) अंतर्गत उत्पादनातील सूट व सवलती 10% पेक्षा जास्त असू नये.
ई) कृषी निर्यातीच्या अर्थसहाय्यात कपात
उ) खाद्यान्नावरील अर्थसहाय्यात कपात
ऊ) उत्पन्न ऱ्हासानिमित्त अर्थसहाय्य
ए) शेतीतून निवृत्त झाल्यास अर्थसहाय्य
ऐ) कापड व वस्त्रासंबंधी करार
ओ) व्यापाराशी संबंधित गुंतवणूक उपाय
औ) बौद्धिक संपत्तीचे अधिकार
अं) सेवांचा व्यापार[21]

वरील सर्व अंतर्भूत बाबींचा करार 'उरुग्वे ट्रेड रिसोल्युशन कमिटीने' 15 डिसेंबर 1993 ला एकमताने पास केला. शेवटी 15 एप्रिल 1994 रोजी 123 देशांनी मान्यता दिली आणि 1 जानेवारी 1995 पासून GATT चे रुपांतर GATS असे करून विश्व व्यापार संघटनेचा जन्म झाला. WTO चे मुख्यालय जिनेव्हा येथे आहे.

**गॅट्स** (GATS) -(General Agreement on Trade and services)

सेवांच्या व्यापारासंबंधी सामान्य करार (GATS) हा जागतिक व्यापार संघटनेचा महत्त्वाचा करार आहे. हा करार 1 जानेवारी 2005 रोजी अंमलात येऊन यात एकूण 149 देशांचा समावेश आहे.

GATS च्या संपूर्ण चौकटीत अनेक सामान्य नियमांचा समावेश होता की, जे सेवांच्या व्यापाऱ्याला लागू आहेत. या नियमांचे पालन सर्वच राष्ट्रांना करावे लागते. त्यांना अटिरहित बंधने म्हटले जाते. याबाबत सर्वांना समान वागणुकीचे तत्त्व (MFN) अधिक मुलभूत मानले जाते.[22]

GATS अंतर्गत 4 अटीरहित बंधनांचा समावेश होतो.

अ) सर्वांना समान वागणुकीचे कलम (MFN)

ब) पारदर्शकता (Transparency)

क) कलह निवारण (Dispute Settlement)

ड) एकाधिकार (Monopolies)23

ही अटिरहित बंधने सर्व प्रकारच्या सेवांना लागू करण्यात आली आहेत.

ज्या सेवांचा आंतरराष्ट्रीय व्यापार करावयाचा आहे त्याचे 12 क्षेत्रात वर्गीकरण करण्यात आले आहे. ते क्षेत्र म्हणजे -

| | | |
|---|---|---|
| 1) व्यापार | 2) वित्त | 3) संचारण |
| 4) आरोग्य | 5) बांधकाम | 6) पर्यटन |
| 7) वितरण | 8) करमणूक | 9) शिक्षण |
| 10) वाहतूक | 11) पर्यावरण | 12) इतर घटक[24] |

ह्या सर्व सेवांना असलेला महत्त्वाचा अपवाद म्हणजे 'Exercise of Government Authority' होय. दुसरा महत्त्वाचा अपवाद 'विमान वाहतुक' अधिकाराबाबतचा आहे.

सार्वजनिक सेवा GATS मधून वगळण्यात याव्यात याबाबत विसंगती आढळते. काही देशात केंद्र व राज्य सरकारे यांच्यामध्ये शिक्षणाचे विकेंद्रीकरण झालेले दिसून येते. खाजगी शिक्षणावर सरकारचे नियंत्रण राहणार नाही. GATS चा प्रत्येक देशांच्या सेवांवर होणारा परिणाम भिन्न राहणार आहे.

## ब) मुक्त आर्थिक धोरणाचा अर्थ :

1984 साली राजीव गांधीच्या कारकिर्दीत औद्योगिक धोरणात क्रांतिकारी बदल व्हायला सुरुवात झाली. 1990 पर्यंत माहिती तंत्रज्ञानाची चर्चा आणि अंशतः स्वीकृती भारतात सुरू होती आणि 1991 च्या जुलै महिन्यात भारताने मुक्त आर्थिक धोरणाकडे वाटचाल सुरू केली.[25]

मुक्त आर्थिक धोरणातील जागतिकीकरण हा या प्रक्रियेतीलच भाग होय. नवीन आर्थिक धोरणांतर्गत जुलै 1991 पासून अवलंबविलेले धोरणालाच 'मुक्त आर्थिक धोरण' म्हणतात. या धोरणाचे वैशिष्ट्य म्हणजे निर्यातीतील स्पर्धा क्षमता, विनिमय दराचे समायोजन वाढविणे, प्रशुल्कात कपात करणे व विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक आणि विदेशी तंत्रविद्या ह्यांच्याबाबत मुक्त धोरण स्वीकारून भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी मिळतीजुळती करणे होय.

1956 च्या धोरणाचा आधार घेत जुलै 1991 ला सरकारने 'मुक्त आर्थिक धोरण' स्वीकारले. मुक्त आर्थिक धोरणाला सरकारने 'रचनात्मक समायोजन कार्यक्रम' असे नाव दिले आहे. या रचनात्मक समायोजन कार्यक्रमावरून संदेश मिळतो की, देशाच्या औद्योगिक व आर्थिक व्यवस्था परिवर्तनाचा हा कार्यक्रम सुरू झालेला आहे. 1947 ते 1991 पर्यंत आर्थिक व औद्योगिक विकास हा मिश्र अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे. 1991 ला भारताने ही अर्थव्यवस्था सोडून 'मुक्त अर्थव्यवस्था' स्वीकारली आहे.[26]

18 मार्च 2001 ला कॉंग्रेसच्या बंगलोर अधिवेशनात केलेल्या भाषणात या धोरणाचे समर्थन करताना पी.व्ही. नरसिंहराव म्हणतात की, ''1991 साली आम्ही जेव्हा मुक्त धोरणाचा स्वीकार केला, तेव्हा तो कार्यक्रम सामान्य माणसाच्या हिताचा विचार करूनच स्वीकारलेला आहे.''[27]

मुक्तपणा याचा अर्थ सरकारची लायसेन्स व परमिट पद्धती बंद करून व्यापार व उद्योग पूर्णपणे खुला करणे, त्यावर कसलेही निर्बंध न घालता मुक्त बाजारपेठेचा स्वीकार करणे, विस्तारित

करणे, बंद करणे, उत्पादन क्षमता वाढविणे किंवा बंद करणे, श्रमशक्ती वापरणे किंवा न वापरणे, भांडवली माल व वस्तू आणि सेवांची आयात-निर्यातीस लायसेन्स व परमीटपासून मुक्ती म्हणजे मुक्त आर्थिक धोरण होय.[28]

प्रत्यक्षात मात्र या धोरणाचा परिणाम म्हणून बेकारी, महागाई आणि दारिद्र्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.

## मुक्त आर्थिक धोरणाचे विश्लेषण :

भारत सरकारने जुलै 1991 रोजी अवलंबिलेले धोरण म्हणजेच मुक्त आर्थिक धोरण होय. या नवीन आर्थिक धोरणालाच 'रचनात्मक समायोजन कार्यक्रम' म्हणून सरकार राबवित आहे. गेली 17 वर्षे हा आर्थिक आणि औद्योगिक व्यवस्था परिवर्तनाचा कार्यक्रम विरोधकांच्या विरोधाला न जुमानता अगदी जोमाने आगेकूच करीत आहे. मुक्त आर्थिक धोरणाची अंमलबजावणी करीत विविध समित्यांच्या माध्यमातून सरकारने अभ्यास केला.

त्या समित्यांनी अहवाल देतांना काही उद्दिष्ट्ये ठेवली होती. त्यात -

1) सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करणे.
2) निर्गुतवणूक करण्यासंबंधी माहिती व त्या क्षेत्राची स्थिती.
3) माहिती व तंत्रज्ञानाचा उपयोग कसा करता येईल.
4) संगणकाचा वापर व त्याचे परिणाम.
5) खाजगी उद्योगांना सवलती देणे.
6) स्वेच्छा निवृत्ती, कामगार कपात याबद्दलचा आढावा
7) कामगार कायदे व औद्योगिक कायद्यांचे परिवर्तन
8) आयात निर्यात व रुपयाचे अवमूल्यन[29]

वरील प्रत्येक उद्दिष्ट यशस्वी करण्यासाठी सरकारने तज्ञा करावी तसेच समिती, आयोग यांच्या माध्यमातून वातावरण निर्मिती, तसेच लोकांची मानसिकता बदलविण्याचे काम केले आहे.

## रचनात्मक समायोजन कार्यक्रम SAP
(Structural Adjustment Programme)

मुक्त आर्थिक धोरण म्हणजेच रचनात्मक समायोजन कार्यक्रम होय. या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशाच्या औद्योगिक व आर्थिक व्यवस्था परिवर्तनाचा कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या दोन्ही क्षेत्रांचा आराखडा पूर्णपणे बदलून नव्या स्वरूपात तो मांडण्याचा निश्चय करण्यात आलेला आहे. त्याकरिता मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार करण्यात आलेला आहे.[30]

## मुक्त आर्थिक धोरण स्वीकारण्याची कारणे -

1991 ला स्वीकारलेल्या मुक्त आर्थिक धोरणाला खालील कारणांचे स्पष्टीकरण दाखविण्यात आलेली होती.

1) देश दिवाळखोरीला गेलेला आहे.
2) विदेशी चलनाचा तुटवडा आहे.
3) देश विदेशी कर्जाच्या जाळ्यात अडकलेला आहे.[31]
4) आयात जास्त व निर्यात कमी
5) संरक्षण खर्चावर अत्याधिक खर्च
6) लोकांना बचतीचे कमी ज्ञान
7) महागाईत भरमसाठ वाढ.[32]

## मुक्त आर्थिक धोरणाची वैशिष्ट्ये -

मुक्त आर्थिक धोरणाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

1) रुपयाचे अवमूल्यन
2) परकीय भांडवलाला मुक्त प्रवेश
3) तोट्यातील सरकारी उद्योग बंद करणे
4) बड्या उद्योगावरील निर्बंध उठविणे
5) खाजगीकरणाला सुरुवात करणे
6) बहुराष्ट्रीय कंपन्यांना मान्यता देणे[33]

## मुक्त आर्थिक धोरणाची तत्त्वे -

मुक्त आर्थिक धोरण महत्त्वाच्या पाच तत्त्वात समाविष्ट आहे.

1) रुपयाचे अवमूल्यन 2) आयात-निर्यात धोरण 3) औद्योगिक धोरण 4) लघु उद्योग विषयक धोरण 5) दरवर्षी सादर होणारे अंदाजपत्रक[34]

## एक्झीट पॉलिसी Exit Policy -

मुक्त आर्थिक धोरणातील हे एक महत्त्वाचे धोरण आहे. एक्झीट धोरण म्हणजे - जे उद्योग क्षेत्रात अगोदरच आहेत आणि ज्यांना उद्योग क्षेत्रात उतरण्याची इच्छा आहे, त्यांच्यासाठी सरकारने 'मुक्त आर्थिक धोरणात' काही सोयी सवलती जाहीर केल्या आहेत. भारतीय कारखानदारी जास्तीत जास्त स्पर्धात्मक बनावी, जास्त उत्पादन व्हावे, जास्त निर्यात व्हावी, विदेशी चलन मिळवावे त्यासाठी या क्षेत्रातील लोकांना प्रोत्साहन देण्याचे कार्य 'नवीन आर्थिक धोरणाच्या' माध्यमातून हाती घेतले आहे. एक्झीट पॉलिसीचा मुख्य गाभा म्हणजे उद्योगात 'स्पर्धा वाढविणे' होय.[35]

एक्झीट पॉलिसी म्हणजे कारखानदारीला स्वातंत्र्य देणे. त्यामध्ये ज्या उद्योगांना पाहिजे तसे उद्योग करणे, एखादा उद्योग आजारी आहे किंवा तोट्यात चालला असेल तर तो बंद करण्याचा किंवा चालू ठेवण्याचा निर्णय मालकांनी घ्यावा त्यामध्ये सरकार हस्तक्षेप करणार नाही. कारखानदारीत परवाना पद्धतीसाठी सरकार कडक बंधने टाकू शकणार नाही.

या धोरणांचा आशय लक्षात घेतला तर भारतीय समाजरचनेतील बहुजन समाज आणि त्यातील अनुसूचित जाती/जमाती, भटके, विमुक्त, आदिवासी, अल्पसंख्यांक आणि ओ. बी.सी. या घटकांचा उल्लेख कोठेही आढळत नाही. त्यामुळे मुक्त आर्थिक धोरणात विकासाचा केंद्रबिंदू 'माणूस' नसून 'उद्योजक' आणि 'व्यापारी' यांचा विकास हेच आहे.

## मुक्त आर्थिक धोरण आणि भारतीय अर्थव्यवस्था -

मुक्त आर्थिक धोरणांतर्गत, जुलै 1991 पासून विविध नवीन धोरणांची अंमलबजावणी सुरू झाली. जलद निर्यात वृद्धी आणि मुक्त आयात धोरणांवर विशेष भर देण्यात आले. त्यानुसार 1991-92 च्या अंदाजपत्रकात भारताने जकात शुल्क 150% व 1992-93 मध्ये आणखी 110% कमी केले. इतर देशांनी प्रशुल्कात फार मोठ्या प्रमाणात कपात केली हे लक्षात घेवून भारत सरकारने त्यांचे नुसते अनुकरण केले आहे.[36]

निर्यात व्यापाराला प्रोत्साहन देण्याकरिता आयात निर्यातीची विशेष योजना (Exim Scrip) लागू करून विविध सवलती जाहीर केल्या गेल्या. पेट्रोलियम व तेल उत्पादने, संरक्षण साहित्य, खते, जीवन तारण औषधे ह्या सारख्या वस्तुंची आयात तेवढी संरक्षित होती. मुक्त आर्थिक धोरणांतर्गत प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीच्या मुक्त प्रवाहाला पोषक वातावरण निर्माण करण्यात आले. विदेशी गुंतवणूकीचे धोरण अधिक उदार करून विदेशी गुंतवणूकदारांकरिता 51% समता शेअर्सची परवानगी 1991 च्या औद्योगिक धोरणानुसार देण्यात आली. ह्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांकरिता भारताची द्वारे खुली झालीत.

मुक्त धोरणांतर्गत जवळपास 80% उद्योगावरील परवान्याबाबतचे निर्बंध उठविण्यात आले. संपत्ती संबंधी MRTP चे निर्बंध सैल करण्यात आले. ह्याचबरोबर CCI&E व DTD ह्यासारखी कित्येक खाती बंद करण्यात आली. भारतीय अर्थव्यवस्था बाजारशक्तीवर जास्त प्रमाणात व प्रशासन शक्तीवर कमी प्रमाणात निर्भर करण्यात आली.[37]

**संदर्भ :-**


1. ॲड. दिलीप डी. काकडे, मुक्त अर्थव्यवस्थेत बहुजन समाजाचे भवितव्य, टेहळणी प्रकाशन, पुणे 2003 पृ. ३१
2. प्रा. ग.ना.झामरे, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर १९९९ पृ. ३८२
3. संपादक, साधना मे 2003 प्रकाशक साधना साप्ताहिक, पुणे 30 पृ. १६
4. ॲड. दिलीप डी. काकडे, जागतिकीकरणात डॉ. आंबेडकर, भुमीपूत्र प्रकाशन, पुणे 2002 पृ. १४७
5. प्रा. ग.ना.झामरे, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर १९९९ पृ. ३८६
6. तत्रैव पृ. ३८८
7. तत्रैव पृ. ३८१
8. पुरूशोत्तम लांडगे, डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२.पृ.२६
9. ॲड. दिलीप डी. काकडे, जागतिकीकरणात डॉ. आंबेडकर, भुमीपूत्र प्रकाशन, पुणे 2002 पृ. ११७
10. प्रा. ग.ना.झामरे, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर १९९९ पृ. ३८१
11. तत्रैव पृ. ३९३
12. ॲड. दिलीप डी. काकडे, जागतिकीकरणात डॉ. आंबेडकर, भुमीपूत्र प्रकाशन, पुणे 2002 पृ.१३१
13. पुरूशोत्तम लांडगे, डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२.पृ.२८
14. तत्रैव पृ. २९
15. तत्रैव पृ. २९
16. प्रा. ग.ना.झामरे, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर १९९९ पृ. २५३

17. पुरूशोत्तम लांडगे, डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२.पृ. ३०
18. प्रा. ग.ना.झामरे, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर १९९९ पृ.३३७
19. तत्रैव पृ. ३४२
20. ॲड. दिलीप डी. काकडे, जागतिकीकरणात डॉ. आंबेडकर, भुमीपूत्र प्रकाशन, पुणे 2002 पृ. १५७
21. तत्रैव पृ. १५९
22. डॉ. आर. वाय. माहोरे, जागतिक व्यापार संघटना आणि सेवांच्या व्यापारासबंधी सामान्य करार.(शोधनिबंध) नागपूर विद्यापीठ, नागपूर.
23. तत्रैव
24. तत्रैव
25. प्रा. ग.ना.झामरे, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर १९९९ पृ. ३८४
26. ॲड. दिलीप डी. काकडे, मुक्त अर्थव्यवस्थेत बहुजन समाजाचे भवितव्य, टेहळणी प्रकाशन, पुणे 2003 पृ. ४२
27. तत्रैव पृ. ४०
28. तत्रैव पृ. १
29. तत्रैव पृ. ४८
30. तत्रैव पृ. ४१
31. तत्रैव पृ. ४२
32. पुरूशोत्तम लांडगे, डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२.पृ. ३८
33. ॲड. दिलीप डी. काकडे, मुक्त अर्थव्यवस्थेत बहुजन समाजाचे भवितव्य, टेहळणी प्रकाशन, पुणे 2003 पृ. ४२
34. तत्रैव पृ. ४२

35. तत्रैव पृ. ४५
36. प्रा. ग.ना.झामरे, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर १९९९ पृ. ३८४
37. तत्रैव पृ. ३८५

1

# मुक्त आर्थिक धोरणाचा अर्थव्यवस्थेवरील प्रभाव

उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण ही जागतिक अर्थव्यवस्थेतील महत्त्वाची तत्त्वत्रयी आहेत या तत्त्वत्रयीला माहिती व तंत्रज्ञानाच्या क्रांतीची, क्रांतिकारक साथ मिळाली आहे. गॅट करार, डंकेल प्रस्ताव, विश्व व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक या जागतिक संस्थांच्या माध्यमातून मुक्त आर्थिक धोरणाची संकल्पना साकार झालेली आहे. त्यात भारताचा समावेश हा जुलै 1991 मध्ये झाला.[1]

भारतात 1991 पासून चलनाचे अवमूल्यन, एक्झीट पॉलिसी, औद्योगिक धोरण, आयात निर्यात धोरण, लघु उद्योग धोरण, कामगार व ओद्योगिक कायदे, विशेष आर्थिक क्षेत्र या माध्यमातून मुक्त आर्थिक धोरणांची अंमलबजावणी सुरू झाली. या धोरणाचा अर्थव्यवस्थेच्या विविध घटकांवर परिणाम झालेला दिसून येतो.

## अ) विदेशी भांडवल :

सुरुवातीला भारतीय अर्थव्यवस्था सर्वार्थाने मिश्र स्वरूपाची होती व त्यात सार्वजनिक क्षेत्रावर भर होता. परंतु 1991 मध्ये मुक्त आर्थिक धोरणाचा अवलंब करण्यात आल्याने भारतीय अर्थव्यवस्था मुक्त अर्थव्यवस्थेकडे ओढवली गेली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत विदेशी भांडवल प्रवाह व विदेशी उच्च पातळीवरील सेवा आणि श्रम हे दिवसेंदिवस वाढतच आहे.

## २) विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक :

आर्थिक सुधारणाच्या काळापासून विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI) जे 1991 मध्ये 534 करोड रु. होती ती सन 2000 पर्यंत 37,039 क रु. पर्यंत पोहचली.[2]

सध्या भारतात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीचा पुरवठा मारिशस या देशाकडून मोठ्या प्रमाणात होत आहे. 1991 पासून 2002 पर्यंत मारिशस देशाद्वारा एकूण 38.7% FDI चा फायदा मिळालेला आहे. सन 1990 पर्यंत विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीकरिता काही विशिष्ट देशांवरच अवलंबून राहावे लागत असे परंतु मुक्त धोरणांचा अवलंब केल्या कारणाने आज इटली, ऑस्ट्रेलिया, द. कोरिया, मलेशिया सारखे देश भारतात गुंतवणूक करीत आहेत.

तक्ता

**भारतात FDI चा पुरवठा**

| | **देश** | **सन 1991** | **सन 2002** | **एकूण राशी करोड रु.** |
|---|---|---|---|---|
| 1 | मारिशस | 1,732 | 4,983 | 27,891 |
| 2 | अमेरिका | 1,645 | 1,084 | 12,334 |
| 3 | जापान | 661 | 324 | 4,925 |
| 4 | इंग्लैंड | 1,098 | 1,014 | 3,769 |
| 5 | जर्मनी | 485 | 438 | 3,604 |
| 6 | निदरलैंड | 450 | 404 | 3,252 |
| 7 | द. कोरिया | 101 | 67 | 2,255 |
| 8 | फ्रांस | 334 | 168 | 1,996 |
| 9 | इटली | 51 | 207 | 1,837 |
| 10 | सिंगापूर | 292 | 18 | 1,501 |

स्त्रोत - मिश्रा व पुरी, भारतीय अर्थव्यवस्था, पृ. 593

**FDI आकर्षित करणारे क्षेत्र करोड रु.**

| | क्षेत्र | एकूण प्रवाह (1991-2005) |
|---|---|---|
| 1 | विद्युत उपकरण (कंम्पूटर सॉफ्टवेअर व इतर) | 20,898 |
| 2 | परिवहन उद्योग | 13,073 |
| 3 | सेवा क्षेत्र | 11,981 |
| 4 | दूरसंचार | 12,076 |
| 5 | इंधन | 10,678 |
| 6 | रसायन | 7,444 |
| 7 | खाद्य प्रक्रिया उद्योग | 4,677 |
| 8 | औषधी | 4,047 |
| 9 | सिमेंट | 3,229 |
| 10 | धातूकर्म उद्योग | 2,679 |

स्त्रोत - प्रतियोगिता सिरीज, साहित्य भवन आगरा

भारतीय अर्थव्यवस्थेत विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीचा प्रवाह सन 2004 मध्ये 25.0% होता तो 2005 मध्ये 33.8% झालेला आहे.

भारतात विदेशी गुंतवणूकीला आकर्षक वातावरण तयार करण्याच्या उद्देशाने डिसेंबर 2004 मध्ये गुंतवणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. श्री. रतन टाटा ह्या आयोगाचे अध्यक्ष होती तर डॉ. अशोक गांगुली आणि श्री. दीपक पारिख सदस्य होते.[3]

विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीचे आकर्षणात क्षेत्रवार वर्गीकरण केल्यास दिल्ली सर्वात प्रथम स्थानी आहे.

**क्षेत्र/ राज्यवार FDI चा प्रवाह**

| | **राज्य/क्षेत्र** | **FDI चा प्रवाह करोड रु.** |
|---|---|---|
| 1 | दिल्ली, उत्तरप्रदेश आणि हरियाणा | 21,539.84 |
| 2 | महाराष्ट्र, दादर व नगरहवेली, दमन व दीप | 17,815.62 |
| 3 | कर्नाटक | 6,416.03 |
| 4 | तामिळनाडू | 5,089.62 |
| 5 | गुजरात | 2,793.23 |

स्त्रोत - प्रतियोगिता सिरीज, साहित्य भवन आगरा

भारताच्या आर्थिक विकासात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीचे स्थान महत्त्वपूर्ण असे आहे. भारतीय भांडवलाच्या वृद्धीच्या दिशेने मूक्त धोरणाद्वारे ते एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

## २) अनिवासी जमा :

विदेशी भांडवल गोळा करण्याचा दुसरा मार्ग म्हणजे 'अनिवासी जमा रक्कम' होय. सन 1890-81 मध्ये एकूण भांडवल प्रवाहात अनिवासी जमा रक्कमेचा हिस्सा 9.7% होता तो 1985-86 च्या कालावधीत 38.2% एवढा वाढलेला आहे. सन 1996-97 मध्ये वाढून 3,350 मी. डॉलरपर्यंत वाढले. सन 2001-02 पर्यंत हा प्रवाह वाढून 2,754 मी. डालर झाला जो एकूण भांडवल प्रवाहाच्या 26.7% एवढा होता.[4]

भारतीय नागरिक आणि विदेशातील भारतीय नागरिकांना स्वतंत्रपणे विदेशी मुद्रा आता भारतात आणता येते. भारतीय रिजर्व्ह बँकेने अशा नागरिकांना मुक्तपणे खाते उघडण्याची सवलत दिली आहे. अशा भांडवलावर 13 सप्टेंबर 1997 पासून व्याज दराचे मुक्त निर्धारण करण्यात येत आहे. त्यावर कोणतीही सीमा राहिलेली नाही.[5] सरकारला विदेशी भांडवलाचे इतके प्रेम आहे की, विदेशी भांडवल भारतात आणण्याकरीता विविध प्रकारचे सुट आणि सवलती जाहीर केल्या जात आहे.

## ३) विदेशी मदत (Foreign Aid)

विकास कार्याकरिता भारताला मिळणारी विदेशी मदत ही इतर देशांना मिळणाऱ्या विदेशी मदतीपेक्षा जास्त आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेत भारताला एकूण 40 करोड रु. विदेशी मदत मिळाली. भारताला मिळणारी विदेशी मदत ही तीन प्रकारची आहे. 1. ऋण 2. अनुदान 3. पी.एल. 480/665. यात अनुदानात मिळालेली मदत ही सर्वोत्तम समजली जाते. सन 1977-78 नंतर पी.एल. 480/665 द्वारे मिळणारी मदत बंद झाली.[6]

**भारताला प्राप्त विदेशी मदत (करोड रु.)**

| **कालावधी** | **ऋण** | **अनुदान** | PL 480/665 |
|---|---|---|---|
| चौथी योजना | 9,665 | 753 | 2,638 |
| पाचवी योजना | 7,913 | 1,795 | 136 |
| 1990-91 | 7,601 | 522 | - |
| 1999-2000 | 17,704 | 2,615 | - |
| 2001 - 2002 | 21,630 | 3,465 | - |

स्त्रोत - मिश्रा, भारतीय अर्थव्यवस्था, पृ. 596

सन 2004-05 या कालावधीत भारताला एकूण 5212.2 मि.अ. डॉलर ऋण आणि 703.7 मि.अ. डॉलर अनुदान मिळाले. 2004-05 पर्यंत प्राप्त विदेशी मदतीचा 66.4% भाग उपयोगात आणल्या गेले

## ब) उद्योग :

24 जुलै 1991 ला नवीन औद्योगिक धोरणांतर्गत उदारीकरणावर भर देण्यात आला. लायसेंस व्यवस्था समाप्त करून खाजगी क्षेत्राच्या विकासावर भर देण्यात आला.

## १) लायसेंस मुक्त धोरण :

सहा उद्योगांना सोडून अन्य सर्व उद्योगांना लायसेंस मुक्त करण्यात आले. यातील सहा उद्योग म्हणजे - 1. मदय 2. सिगरेट

३. धोकादायक रसायने ४. स्फोटके ५. सुरक्षा ६. औषधे हे होत. लघु उद्योगांनाही लायसेंस मुक्त करण्यात आले.[8]

## २) सार्वजनिक क्षेत्रासाठी आरक्षित उद्योग :

1956 च्या औद्योगिक धोरणात 17 उद्योग सार्वजनिक क्षेत्रांकरिता आरक्षित होते. सध्या केवळ 3 उद्योग सार्वजनिक क्षेत्राकडे सुरक्षित ठेवण्यात आले आहेत. त्यात 1. परमाणु ऊर्जा 2. भारत सरकारचे परमाणु ऊर्जा आदेश. 15 मार्च 1995 च्या अधिसुचनेतील समाविष्ट 3. रेल्वे सेवा यांचा समावेश होतो. सन 2001 मध्ये सुरक्षा क्षेत्रात 26% विदेशी गुंतवणुकीला मंजुरी देण्यात आली.[9]

लघु उद्योगांना विशेष संरक्षण देऊन त्याकरिता 506 वस्तु संरक्षित करण्यात आल्या आहेत.

**उद्योगातील वास्तविक भांडवल आणि सार्वजनिक क्षेत्राची हिस्सेदारी करोड रू.**

| क्षेत्र | | वास्तविक भांडवल करोड रु. | | सार्वजनिक क्षेत्राचा हिस्सा % | |
|---|---|---|---|---|---|
| | | 2003 | 2004 | 2003 | 2004 |
| 1 | खनन | 79,351 | 82,604 | 92.31 | 92.77 |
| 2 | विनिर्माण | 10,70,999 | 17,23,391 | 12.67 | 11.72 |
| 3 | विद्युत, गॅस आणि पाणी पुरवठा | 3,03,762 | 3,10,832 | 85.81 | 85.58 |

स्त्रोत - प्रतियोगिता सिरीज, आगरा, पृ. 11

## ३) MRTP कायद्याची समाप्ती :

नवीन उद्योग धोरणात 'एकाधिकार आणि प्रतिबंधक व्यापार व्यवहार' अधिनियमांतर्गत येणाऱ्या कंपन्यांची परिसंपत्ती सीमा समाप्त करण्यात आली. आता नव्या कंपन्यांची स्थापना, विस्तार,

समायोजन, अधिनिकरण तसेच गुंतवणूकदारांची निवड करण्याकरिता केंद्र सरकारची परवानगी घेण्याची गरज राहिलेली नाही.[10]

## ४) प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक धोरण :

सन 2000-01 मध्ये विदेशी गुंतवणूकीला प्रोत्साहन देण्याकरिता महत्त्वपूर्ण धोरणांचा वापर करण्यात आला त्यात -

1) ई-कॉमर्स क्षेत्रात 100% विदेशी गुंतवणूकीला परवानगी देण्यात आली.

2) विद्युत उत्पादनात एफ.डी.आय. करिता असलेली 1500 करोड रुपयाची सीमा समाप्त करण्यात आली.

3) तेल शोधन क्षेत्रात FDI करिता 100% सीमा निर्धारित करण्यात आली.

4) विशेष आर्थिक क्षेत्रात (SEZ) 100% गुंतवणूकीला मान्यता देण्यात आली.

5) विमा क्षेत्रात 26% FDI ला मंजुरी.

6) समुद्री उपकरणात विदेशी गुंतवणूकीला प्रोत्साहन देण्यात आले.

7) दूरसंचार क्षेत्रात 100% गुंतवणूकीला मान्यता देण्यात आली.

8) सुचना व माहिती क्षेत्रात विदेशी गुंतवणूकीला प्रवेश खुला करण्यात आला.

2002-03 वर्षात विदेशी गुंतवणूकीकरिता विविध सवलतींची घोषणा करण्यात आली. त्यात -

1) औषधी क्षेत्रात 100% विदेशी गुंतवणूक

2) हवाई वाहतूक क्षेत्रात 100% विदेशी गुंतवणूक

3) हॉटेल क्षेत्रात 100% विदेशी गुंतवणूक

4) कुरियर क्षेत्रात 100% विदेशी गुंतवणूक

5) इंटरनेट सेवेत 74% विदेशी गुंतवणूक

6) बॅकींग क्षेत्रात 74% विदेशी गुंतवणूक

7) सुरक्षा क्षेत्रात 24% विदेशी गुंतवणूक[11]

## ९) प्रमुख उद्योग :

भारतात मुख्यतः कापड उद्योग, लोह उद्योग, ज्यूट उद्योग, साखर उद्योग, सिमेंट उद्योग इ. प्रमुख उद्योग समजले जातात.

### i) कापड उद्योग :

भारतातील कापड उद्योग तीन क्षेत्रात विभागला आहे. 1. मील 2. विद्युत 3. हस्त. सरकारने नवीन धोरणात कापड उद्योगाला विविध सवलती दिल्या आहेत. 2004-05 या कालावधीत कापडाचे उत्पादन 45,378 मिलियन वर्ग मी. होते. 2005-06 मध्ये त्यात 9% ने भर पडलेली आहे.[12]

### ii) लोह उद्योग :

1986 मध्ये लहान लोह कारखाने खाजगी क्षेत्रांकरिता खुले करण्यात आले होते.

2000 - 01 मध्ये लोहाचा उपभोग 265 लाख टन होता तो वाढून 2001 - 02 मध्ये 270 लाख टन झाला. 2005-06 या कालावधीत लोहाचे उत्पादन 24.26 मिलियन टनापर्यंत पोहचले आहे.[13]

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक समितीने नवीन राष्ट्रीय लौह धोरण 3 नोव्हेंबर 2005 ला मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार या धोरणाचे उद्देश ठरविण्यात आले आहेत. त्यात -

1) लोह उद्योगाला गुणवत्तेत सुधारणेकरिता शक्तीशाली आणि प्रतिस्पर्धी बनविणे.

2) लोह उत्पादन 2019-20 पर्यंत 100 मी. ला करणे.

3) लोह उत्पादनाचा दर प्रतिवर्षी 7.3% करणे.

4) लोह उद्योगात 2 लाख करोड रु. गुंतवणूक करण्यास मंजुरी

5) कोळशाच्या पुरवठ्यातील अडथळे दूर करणे.[14]

### iii) साखर उद्योग :

योजना काळात भारताच्या साखर उत्पादनात वाढ झालेली आहे. सन 1994-95 या वर्षात साखरेचे उत्पादन 126 लाख टन

झाले त्यामुळे भारत साखर उत्पादनात जगात पहिल्या क्रमांकावर आला. सन 2000-01 मध्ये साखरेचे उत्पादन वाढून 184 लाख टन झाले.

जानेवारी 1997 च्या नवीन धोरणात साखर उद्योगाला लायसेंस मुक्त करण्यात आले. भारत सरकारने बी.बी. महाजन समितीची नेमणूक करून साखर उद्योगाचे अध्ययन केले. या रिपोर्टनुसार काही उपाय सुचविण्यात आले.

1) साखर उद्योग स्पर्धात्मक करण्यावर भर

2) सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे साखर वाट्यावर प्रतिबंध

3) ऊस पेरण्यापूर्वी वैधानिक न्युनतम किंमत जाहीर करणे.

4) 15 कि.मी. च्या आत साखर उद्योग उघडण्यावर भर

5) नवीन साखर उद्योगांच्या सवलतीवर रोक लावणे.[15]

## iv) सिमेंट उद्योग :

1989 च्या बजेटमध्ये सिमेंट उद्योगाचे पूर्णपणे विकेंद्रीकरण करण्यावर भर देण्यात आला. 1991 मध्ये सिमेंट उद्योगाला पूर्णपणे लायसेंस मुक्त करण्यात आले. नवीन सरकारी धोरणांचा अवलंब करण्यात आल्याने त्याचा योग्य परिणाम सिमेंट उत्पादनावर दिसून आला. सन 1982 मध्ये उत्पादन क्षमता 290 लाख टन होती ती 1999-2000 मध्ये 1,130 लाख टनापर्यंत पोहचली.[16]

सिमेंट उद्योगाची निर्यात क्षमता सुद्धा वाढलेली आहे. 2005 मध्ये 5.10 मी. टन सिमेंट निर्यात करण्यात आला. तसेच 2006 करिता 142.0 मी.टन निर्यातीचे लक्ष्य ठेवण्यात आले.[17]

## v) पर्यटन उद्योग :

विश्व पर्यटन संगठनेनुसार सन 2004 मध्ये 763 मिलीयन पर्यटकांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यात्रा केली. सन 2004-05 मध्ये भारताच्या पर्यटन उद्योगात 24.0% वाढ झालेली आहे. सन 2003-04 मध्ये 3779 मी. डॉलर एवढी रक्कम पर्यटन क्षेत्रापासून मिळाली. त्या तुलनेत सन 2004-05 मध्ये वाढ होऊन मी. 5029 अ. डॉलर प्राप्त झाले.[18]

## ६) लघु उद्योग :

30 ऑगस्ट 2000 रोजी प्रधानमंत्री यांनी लघु उद्योगांकरिता व्यापक धोरणाची घोषणा केली. त्यात -

1) लघु उद्योगातील प्रतिस्पर्धामध्ये सुधारणा करण्याकरिता उत्पादन शुल्क सीमा 50 लाख रु. वरून 1 करोड रु. करणे.

2) तांत्रिक सुधारणा करण्याकरिता कर्जात 12% सबसिडी देणे.

3) लघु उद्योगात प्रयोगशाळा स्थापन करणे.

4) सम्मीलीत कर्जाची सीमा 10 लाख रु. वरून 25 लाख रु. करणे.

या व्यापक धोरणाला लागू करण्याकरिता आतापर्यंत विविध स्तरावर सुधारणा करण्यात आल्या.

1) 29 एप्रिल 2002 ला कर्जाची सीमा 5 लाख रु. वरून 15 लाख रु. करण्यात आली. यात जमानत ठेवण्याची गरज नाही.

2) 1 सप्टेंबर 2000 पासून लघु उद्योगांसाठी उत्पादन शुल्कातील सुट 1 करोड रु. करण्यात आली.

3) हस्त उद्योगात गुंतवणूकीची सीमा वाढवून 5 करोड रु. करण्यात आली.

4) रेडिमेट कपड्यावरील आरक्षण हटविण्यात आले.

5) 29 जून 2001 ला चामड्याच्या वस्तू, जुते आणि खेळणी सारख्या 14 वस्तुंवरील आरक्षण कमी करण्यात आले.

6) 2003-04 पर्यंत रसायन, प्लास्टिक, वस्तू, कागद या सारख्या 75 वस्तुंवरील आरक्षण कमी करण्यात आले.[19]

सध्या लघु उद्योगात 506 वस्तु आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.

**लघु उद्योगाची स्थिती**

| वर्ष | एकूण युनिट (लाख रु.) | उत्पादन (करोड रु.) 1993-94 च्या स्थिर किंमतीवर | रोजगार (लाख रु.) | निर्यात (करोड रु.) |
|---|---|---|---|---|
| 2000-01 | 101.10 | 1,84,401 | 239.09 | 69,797 |
| 2001-02 | 105.21 | 1,95,613 | 249.09 | 71,244 |
| 2002-03 | 109.49 | 2,10,636 | 260.13 | 86,013 |
| 2003-04 | 113.95 | 2,28,730 | 271.36 | 97,644 |
| 2004-05 | 118.59 | 2,51,511 | 282.91 | - |

स्त्रोत - प्रतियोगिता सिरीज, आगरा, पृ. 13

10 ऑगस्ट 2005 रोजी लघु उद्योगांच्या विकासाकरिता 'कर्ज योजना' सुरू करण्यात आली. त्यानुसार 29 सप्टेंबर 2005 पासून कर्जाची सीमा 40 लाख रु. वरून वाढवून 1 करोड रु. करण्यात आली आणि आर्थिक सहाय्यता दर 12% वरून 15% करण्यात आला.[20]

## क) कृषी क्षेत्र :

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी हा महत्त्वाचा घटक होय. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात 22% वाटा हा कृषी क्षेत्राचा आहे. देशातील 70% लोकसंख्या ही जीविकेसाठी एकट्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. देशातील एकूण शेतीच्या 60% शेती मान्सूनवर अवलंबून आहे.

भारत सरकारने 28 जुलै 2000 रोजी राष्ट्रीय कृषी धोरणाची घोषणा केली. त्यात -

1) कृषी विकासाला गती देण्याकरिता खाजगीकरणाचा वापर करणे.
2) ठेका कृषी तसेच पट्ट्याने देण्याची व्यवस्था करणे.
3) कृषी क्षेत्रातील खाजगीकरणाला प्रोत्साहन देणे.
4) WTO च्या करारानुसार मात्रात्मक निर्बंध कमी केल्याने किंमतीतील उतार चढावापासून शेतकऱ्यांना संरक्षण देण्याकरिता निर्यातीवर भर देणे.

5) 'राष्ट्रीय पशुधन प्रजनन युक्ती' धोरणाचा अवलंब करणे. त्यातून दूध, अंडे आणि पशुधनाचे उत्पादन वाढविणे.
6) पशुपालन, कुक्कुटपालन, डेरी आणि जल कृषीला उच्च प्राथमिकता देणे.
7) देशातील कृषी बाजारांना उदार बनविणे. (खाजगी)
8) व्यापारी शेतीवरील कर निर्धारणाचे समीक्षण करणे.
9) देशातील कृषी मालाच्या वाहतुकीतील प्रतिबंध कमी करणे.
10) उत्पादन शुल्काचे समीक्षण करणे.
11) ग्रामीण विद्युतीकरणावर भर देणे.
12) शेतकऱ्यांना विमा सोयी पुरविणे.

इ. बाबींचा समावेश करण्यात आला.[21]

CSO द्वारे 7 फेब्रुवारी 2006 ला केलेल्या निष्कर्षाद्वारे कृषी विकास दर 2.3% अनुमानित करण्यात आला.

खाद्यान्न उत्पादन (मिलियन टन)

| | **पिक** | **2001 - 02** | **2005 - 06** |
|---|---|---|---|
| 1 | तांदूळ | 93.3 | 73.8 |
| 2 | गहू | 72.8 | - |
| 3 | दाळ | 13.4 | 5.0 |
| 4 | खरीप व रब्बी पिके | 212.9 | 105.3 |

स्त्रोत - प्रतियोगिता सिरीज, आगरा, पृ. 7

**व्यापारी शेती उत्पादन**
**(मिलियन टन)**

| | **पिक** | **2001 - 02** | **2005 - 06** |
|---|---|---|---|
| 1 | मुंगफल्ली | 7.0 | 5.9 |
| 2 | सरसो | 5.1 | - |
| 3 | सोयाबीन | 6.0 | 6.6 |
| 4 | इतर तेलबिया | 2.6 | 2.1 |
| 5 | कापूस | 10.0 | 15.9 |
| 6 | ज्यूट | 10.0 | 15.9 |
| 7 | ऊस | 11.7 | 10.1 |

स्त्रोत - प्रतियोगिता सिरीज, आगरा, पृ. 7

ऑक्टोबर 2004 मध्ये दहाव्या पंचवार्षिक योजनेत ‘राष्ट्रीय कार्बनिक शेती परियोजना’ लागू करण्यात आली. तिचा उद्देश कार्बनिक शेतीचे उत्पादन, प्रोत्साहन आणि बाजार विकास हा होता.

भारत सरकारचे शेती धोरणामुळे भारताला अन्नधान्यात स्वयंपूर्णता गाठता आली परंतु इतर देशांच्या तुलनेत भारत अजूनही मागेच आहे.

**विविध देशांची प्रति हेक्टर उत्पादकता**
**सन 2000 (किलोग्रॅम प्रति हेक्टर)**

| | पिक | देश | उत्पादकता |
|---|---|---|---|
| 1 | गहू | 1 फ्रांस<br>2 चीन<br>3 अमेरिका<br>4 भारत | 7130<br>3730<br>2820<br>2780 |
| 2 | तांदुळ | 1. जापान<br>2. चीन<br>3. इंडोनेशिया<br>4. भारत | 7040<br>6700<br>6230<br>3010 |
| 3 | कापूस | 1. चीन<br>2. अमेरिका<br>3. पाकिस्तान<br>4. भारत | 840<br>690<br>530<br>300 |
| 4 | मुंगफल्ली | 1. चीन<br>2. अमेरिका<br>3. अर्जेन्टिना<br>4. भारत | 3300<br>2800<br>2750<br>860 |

स्त्रोत - मिश्रा व पुरी, भारतीय अर्थव्यवस्था, पृ. 307

सरकारने वर्ष 1996-97 मध्ये 'त्वरित सिंचन लाभ कार्यक्रमाला' सुरुवात केली. त्याद्वारे मार्च 2005 पर्यंत 184 मोठ्या परियोजना व 4169 लहान परियोजनांकरिता 17,537 करोड रु. उपलब्ध करण्यात आले.

भारतीय शेतकऱ्याला तीन कारणास्तव मोठ्या प्रमाणात कर्जाची आवश्यकता भासते. 1. उत्पादन कार्यासाठी 2. आदाने

खरेदी करिता 3. मजुरी देण्याकरिता. कृषीचे व्यापारीकरण करण्यात आल्याने कर्जाची मागणीही वाढलेली आहे.

**संस्थागत कर्ज (करोड रु.)**

| | | 2003 - 04 | 2005 - 06 |
|---|---|---|---|
| 1 | सहकारी बँक | 26,959 | 28,947 |
| 2 | क्षेत्रीय ग्रामीण बँक | 7581 | 11,146 |
| 3 | व्यापारी बँक | 52,441 | 68,557 |

स्त्रोत - प्रतियोगिता सिरीज, आगरा, पृ. 8

सन 1999-2000 मध्ये रब्बी पिकांकरिता विमा योजना लागू करण्यात आली. ह्या योजनेचा व्याप वाढून आज 23 राज्यात आणि 2 संघराज्यात ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.[22]

निर्यात व्यापाराच्या बाबतीत कृषीचा विचार केल्यास 2003-04 मध्ये 11.9% ने घसरून 2004-05 मध्ये 10.2% झाले. ही घसरण कायम राहून ऑक्टोबर 2005 पर्यंत 9.6% एवढी झाली. कृषी आयात 2003-04 मध्ये 3708.2 मी.अ. डॉलर होती. ती वाढून 2004-05 मध्ये 3811 मी.अ. डॉलर एवढी झाली.[23]

## ड) सेवा क्षेत्र :

भारताच्या सेवा क्षेत्रात व्यापार, हॉटेल, परिवहन, संचार, वित्त सेवा आणि सामुदायिक सामाजिक सेवांचा समावेश होतो. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात सेवा क्षेत्राचा वाटा 54% एवढा मोठा आहे. कर प्राप्तीच्या उद्देशाने सरकारने 2006-07 मध्ये सेवा क्षेत्रात 15 नवीन सेवांचा समावेश केला.

त्यात -

1) ए.टी.एम. ऑपरेशन

2) प्रबंधन
3) रजिस्ट्रार सेवा
4) शेअर हस्तांतरण सेवा
5) वसुली अभिकर्ता
6) जाहिरात स्थळ
7) प्रिंट मिडियाद्वारे खेळाची स्पर्धा सोडून सर्वच स्पर्धा
8) आंतरराष्ट्रीय विमान यात्रा (किफायत श्रेणी सोडून
9) रेल्वेद्वारे माल परिवहन
10) जनसंपर्क सेवा
11) पोत प्रबंधन सेवा
12) इंटरनेट टेलिफोन सेवा
13) क्रेडिट कार्ड
14) डेबिट कार्ड
15) चार्ज कार्ड[24]

ह्या सर्व सेवांवर 1 एप्रिल 2010 पर्यंत सामान्य सेवा कर (GST) लागू करण्याचा सरकारचा मानस आहे.

## १) संचार सेवा Communications -

देश स्वतंत्र झाला तेव्हा देशात पोस्ट ऑफिसची संख्या 23,344 होती. आज मात्र ती संख्या वाढून 1,55,669 एवढी झाली आहे. भारत सरकारने मुक्त आर्थिक धोरणांतर्गत संचार सेवेत प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीची मर्यादा 49% एकूण 74% केली आहे. त्याचा परिणाम म्हणून 2005 पर्यंत या क्षेत्रात 41,551 करोड रु. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक करण्यात आली.

31 डिसेंबर 2005 मध्ये ‘एक गाव एक टेलिफोन’ VPT चा प्रयोग करून 5,39,572 गावात टेलिफोन लावण्यात आले. सध्या 2 लाख गावात PCO आणि 14.18 मिलियन फोन उपलब्ध झालेले आहेत. 1 मार्च 2006 रोजी BSNL द्वारा ‘INDIA ONE’ योजनेद्वारा संपूर्ण भारतात 1 रु. प्र. मिनिट दराने सेवा प्रदान करण्यात आली.[25]

नवीन राष्ट्रीय दूरसंचार धोरणांतर्गत सन 2007 पर्यंत दूरसंचार क्षेत्रात विदेशी गुंतवणुकीचा हिस्सा दुप्पट करण्यावर तर 2010 पर्यंत तिप्पट करण्यावर भर आहे. वर्ष 2005 पर्यंत 90,000 करोड रु. गुंतवणूक अनुमानित करण्यात आली. सन 2010 पर्यंत प्रत्येक दोन घरामागे एक फोन असणार आहे. नवीन धोरणात ब्रॉडबॅन्ड सेवेचा विस्तार करण्यात येणार असून 2010 पर्यंत 4 करोड इंटरनेट कनेक्शन लावण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.[26]

## २) बँक सेवा :

भारत सरकारने विद्यमान वित्तीय प्रणालीचा अभ्यास करण्याकरिता रिजर्व्ह बँकेचे भुतपूर्व गव्हर्नर एम. नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली (9) नऊ सदस्यांची समिती स्थापन केली. नरसिंहम समितीने आपला अहवाल 17 नोव्हेंबर 1991 रोजी संसदेत सादर केला. त्यानुसार -

1) बँक संरचना चार भागात विभागणे.

2) बँकावर लक्ष ठेवण्याकरिता एका अर्ध स्वायत्त संस्थेची स्थापना करणे.

3) 8% भांडवल पर्याप्तता अनुमानाचे लक्ष्य ठेवण्यात आले.

4) शाखा लायसेंस समाप्त करणे.

5) 1991-92 पासून वैधानिक तरलता अनुपात क्रमाक्रमाने कमी करणे.

6) वित्तीय क्षेत्रात स्पर्धा निर्माण करणे.

7) वित्तीय संस्थांच्या कार्य पद्धतीत सुधारणा करण्यासाठी विवेकपूर्ण आचारसंहिता तयार करणे.

भारत सरकारने नरसिंहम समितीच्या शिफारशी सिद्धांत रूपाने अवलंबिलेल्या आहेत. त्यानुसार प्रमुख सुधारणा म्हणजे -

1) वैधानिक तरलता अनुपापात आणि नगद कोष अनुपातात घट करणे.

2) बॅकांना ताळेबंद पत्रक प्रसिद्ध करण्यावर भर देणे.

3) बँक वित्ताच्या अधिक निर्धारण करण्याकरिता लवचिक धोरणांचा अवलंब करणे.[27]

## ३) वाहतूक सेवा :

भारताच्या आर्थिक विकासात परिवहन सेवेचे मोठे योगदान आहे. भारतात वाहतुकीसाठी रस्ते, रेल्वे, जल वाहतूक आणि हवाई वाहतुकीचा वापर केल्या जातो.

### i) रस्ते वाहतूक :

भारतीय रस्ते वाहतूक जाळे हे जगातील मोठे जाळे आहे. ज्यात रस्त्यांची लांबी 3.32 मिलियन कि.मी. आहे. यात राष्ट्रीय राज्य मार्गाची लांबी 65,569 कि.मी. राज्य राजमार्गाची लांबी 1,28,000 कि.मी. प्रमुख जिल्हा रस्त्यांची लांबी 4,70,000 कि.मी. आणि ग्रामीण रस्त्यांची लांबी 26,50,000 कि.मी. आहे.

भारत सरकारने राष्ट्रीय राजमार्ग विकास योजना NHDP सन 1999 ला सुरू केली. ह्या योजनेचा उद्देश राष्ट्रीय राजमार्ग 13,000 कि.मी. चे 4/6 लेन मार्ग तयार करणे आहे.[28]

या योजनेकरिता सरकारने 54,000 करोड रु. चा निधी उपलब्ध केलेला आहे. ही योजना सन 2007 पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य सरकारने आखले आहे. यात 5,846 कि.मी. सुवर्ण चतुर्भुज मार्ग आणि 7300 कि.मी. लांबीचे उत्तर-दक्षिण व पूर्व-पश्चिम मार्गाचा समावेश आहे.

सन 1995 ला राष्ट्रीय प्रमुख मार्ग अधिनियम पास झाल्यानंतर खाजगी क्षेत्रात तीन प्रमुख मार्गाची योजना तयार करण्यात आली. यात ठाणे भिवंडी (महाराष्ट्र), उदयपूर (राजस्थान) आणि रस्त्यावर पुल तयार करण्याकरिता चालटन (गुजरात) यांचा समावेश आहे.[29]

भारतात 60 राज्यीय रस्ते परिवहन उद्योग आहेत ज्यात 1994 पर्यंत 1.02 लाख बस होते. यात 5,000 करोड रु. गुंतविण्यात आले. यातून 15 लाख लोकांना रोजगार निर्माण करण्यात आला.[30]

### ii) रेल्वे वाहतूक :

भारतात रेल्वे सेवेची सुरुवात सन 1853 ला झाली. भारतात पहिली रेल्वे मुंबई-ठाणे (34 कि.मी.) दरम्यान चालली.

आज देशभरात 7031 रेल्वे स्टेशन असून 63,221 कि.मी. लांबीचे रेल्वे जाळे पसरले आहेत.

**31 मार्च 2004 पर्यंत रेल्वेचे जाळे**

| **रेल्वे लाईन (गेज) (कि.मी.)** | **एकूण रेल्वे मार्ग** |
|---|---|
| मोठी लाईन (1.676 मि.मी.) | 46,807 |
| मिटर गेज (1 मि.मी.) | 13,290 |
| लहान लाईन (0.762 मि.मी.) | 3124 |
| एकुण लांबी | 63,221 |

स्त्रोत - प्रतियोगिता सिरीज, पृ. 18

मेट्रो रेल्वे सेवा भारतात सुरू करण्यात आलेली आहे. भारत सरकार आणि दिल्ली क्षेत्रीय सरकार द्वारा कलकत्ता-दिल्ली या मार्गावर मेट्रो सेवा सुरू करण्यात आली. सध्या भारतात 16 रेल्वे झोन आहेत.[31]

2006-07 च्या रेल्वे बजेटमध्ये 55 नवीन गाड्यांचा प्रस्ताव सरकार समोर आहे. त्यात अत्याधुनिक 'गरीब रथ' आणि 'गरीब नवाज' नावाच्या दोन रेल्वे सुरू करण्यात येत आहेत. रेल्वे सेवेच्या अत्याधुनिकरणात इंटरनेट सेवेचा प्रथमच 2006-07 मध्ये वापर करण्यावर भर देण्यात आला.

वर्ष 2006 ला 'मुस्कान सहित रेल यात्रा वर्ष' सरकारने घोषित केले.

## इ) सामाजिक क्षेत्र (Social Sector)

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संगठनेद्वारे जून 2004 रोजी देशात रोजगारी आणि बेरोजगारीचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यानुसार खालील निष्कर्ष समोर आले -

1) 75% लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. ग्रामीण क्षेत्रातील सरासरी परिवाराचा आकार शहरी परिवाराच्या 5.0% आहे.

2) साक्षरतेच्या बाबतीत ग्रामीण भागात पुरुषांची साक्षरता 62% तर स्त्रियांची साक्षरता 43% आहे. शहरी पुरुषांची साक्षरता 80% तर स्त्रियांची साक्षरता 68% आहे.

3) ग्रामीण क्षेत्रात कृषी एकमेव रोजगारीचे साधन असून 66% पुरुष आणि 84% स्त्रिया शेती क्षेत्रावर अवलंबून आहेत.

4) ग्रामीण मजुरी दर 56.53 रु. एवढा आहे. तर शहरी भागात मजुरी दर 75.51 रु. आहे.[32]

भारत सरकारने सन 2005-06 मध्ये सामाजिक क्षेत्राच्या विकासाकरिता महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यात -

1) 2 फेब्रुवारी 2006 पासून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गारंटी योजना

2) 1000 लोकसंख्या असलेल्या गावाला मुख्य रस्त्यासोबत जोडणे.

3) 1,25,000 गावात विद्युत कनेक्शन देणे.

4) 66,822 गावात टेलिफोन सेवा देणे.

5) कामाच्या बदल्यात अन्न योजने करिता 200-06 मध्ये 11,000 करोड रु. राशी आवंटित करण्यात आली.

6) 12 एप्रिल 2005 पासून ग्रामीण निर्धनांकरिता 'राष्ट्रीय ग्रामीण स्वास्थ्य मिशन' सुरू करण्यात आले.

7) अंत्योदय योजनेत 2 करोड ऐवजी 2.5 करोड परिवारांचा समावेश करते.

8) सर्व शिक्षा अभियानाकरिता 7,156 करोड रु. आवंटित करण्यात आले.[33]

## ई) विदेशी व्यापार :

भारतीय अर्थव्यवस्थेत 1991 च्या मुक्त आर्थिक धोरणाद्वारे व्यापारावरील प्रतिबंध कमी करून प्रशुल्क कमी करण्यात आले. नव्या धोरणांचा मुख्य उद्देश निर्यात व्यापार वाढविणे हाच होता.

2001-02 आणि 2004-05 या चार वर्षात निर्यातीवर मोठ्या प्रमाणात भर देण्यात आला. त्यामुळे निर्यात वृद्धी 22.5% झाली त्याविरुद्ध आयात 28.5% झाली. या चार वर्षात 66,728 मि. डॉलर पर्यंत निर्यात व्यापार करण्यात आला तर आयात व्यापार

79,881 मि. डॉलर पर्यंत वाढला. या चार वर्षात 18,153 मि. डॉलरचे नुकसान देशाला झाले.

2004-05 पर्यंत व्यापार घाटा 36,629 मि. डॉलर पर्यंत पोहचला.[34]

31 ऑगस्ट 2004 ला 2004-09 पर्यंत कालावधीकरिता नवीन विदेशी व्यापार धोरणांची आखणी करण्यात आली. त्यात -

1) 2001 पर्यंत विश्व व्यापारात भारताचा हिस्सा दुप्पट करणे.

2) रोजगाराभिमुख निर्यातीवर भर. त्यात - कृषी, हस्तशिल्प, हातमाग, चामडे, रत्न व आभूषण व्यापारावर भर देणे.

3) 'विशेष कृषी उत्पादन योजना' लागू करणे.

4) मुक्त व्यापारात भर घालण्याकरिता विशेष आर्थिक क्षेत्रांची स्थापना करणे. (SEZ)

5) सर्व निर्यात सेवा करमुक्त करणे.

6) बीज आयातीला प्रोत्साहन देणे.

याच धोरणाला 2005 मध्ये पूरक योजना जोडली गेली त्यानुसार -

1) निर्यात वृद्धी सोबतच आयात वृद्धीला आर्थिक विकासासोबत जोडण्यात आले.

2) कृषी मालाच्या निर्यातीवरील करात सुट

3) त्सुनामी प्रभावित मत्स साधनाच्या आयातीवरील शुल्कात सुट

4) पोल्ट्री आणि दुग्ध उत्पादने कृषी योजनेत समाविष्ट करण्यात आले.[35]

वस्तु आणि सेवा युक्त भारताचा विदेशी व्यापार 2004-2005 मध्ये 44.2% वृद्धी होऊन तो 268 बिलियन अमेरिकन डॉलर झाले.

भारताची व्यापारी निर्यात 2004-05 मध्ये 80 बिलियन डॉलर पर्यंत पोहचली. सध्या भारत जगात 80 वा व्यापारी निर्यात तर 23 वा व्यापारी आयात करणारा देश बनलेला आहे.

विश्व व्यापारी निर्यातीत 1990 मध्ये भारताचा हिस्सा 0.5 होता तो वाढून 2003 मध्ये 0.8% एवढा झाला. वैश्विक

व्यापाराची स्थिती पाहता 2009 पर्यंत भारताचा व्यापारी निर्यात व्यापार 150 बिलियन डॉलरपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.[36]

## भारताची आयात निर्यात व्यापाराची संरचना

### आयात तक्ता

| | | **2003-04** | **2005-06** |
|---|---|---|---|
| 1 | पी.ओ.एल | 26.3 | 31.8 |
| 2 | मोती, मूल्यवान रत्न | 9.1 | 8.1 |
| 3 | भांडवली वस्तू | 12.7 | 10.3 |
| 4 | इलेक्ट्रानिक वस्तू | 9.6 | 8.2 |
| 5 | सोने आणि चांदी | 8.8 | 9.0 |
| 6 | रसायन | 7.4 | 5.6 |
| 7 | खाद्य तेल | 8.2 | 1.6 |
| 8 | कोळ, कोळसा व क्रिकेट | 1.8 | 2.0 |
| 9 | धातु स्क्रैप | 1.7 | 2.6 |
| 10 | हत्यार आणि प्रकाशकीय वस्तू | 1.6 | 1.3 |
| | **एकूण आयात** | **100.0** | **100.0** |

### निर्यात

| | | **2003-04** | **2005-06** |
|---|---|---|---|
| 1 | प्राथमिक उत्पादन | 16.4 | 16.1 |
| 2 | कृषी व संबंधित | 12.4 | 9.9 |
| 3 | खनिज | 4.0 | 5.4 |
| 4 | विनिर्मित वस्तू | 76.9 | 72.4 |
| 5 | रेडिमेट कपडे | 15.6 | 11.8 |
| 6 | रत्न व जवाहरात | 16.6 | 17.9 |
| 7 | इंजिनिअरिंग वस्तू | 19.3 | 20.1 |
| 8 | रसायन आणि उत्पादने | 11.9 | 11.1 |

| | | | |
|---|---|---|---|
| 9 | चामडे आणि उत्पादने | 2.3 | 1.7 |
| 10 | हस्तशिल्प | 0.8 | 0.5 |
| 11 | पेट्रोलियम व कच्चे तेल | 5.6 | 11.1 |
| | **एकूण** | **100.0** | **100.0** |

स्त्रोत - प्रतियोगिता सिरीज, पृ. 26

भारताचा एकूण 11 देशांशी व्यापार चालतो. अमेरिका एक मोठा व्यापारी भागीदार म्हणून आज समोर येत आहे तर चीन आणि हांगकांगचा हिस्सा 9.4% असून दुसऱ्या क्रमांकावर आहे. सिंगापूर या देशासोबत ही भारताचा व्यापारी संबंध वाढत आहे.

## भारताचे व्यापारी संबंध
## (आयात निर्यात)

| | **देश** | **2003-04** | **2005-06** |
|---|---|---|---|
| 1 | संयुक्त राज्य अमेरिका | 11.6 | 10.3 |
| 2 | यु.के. | 4.4 | 3.7 |
| 3 | बेल्जीयम | 4.1 | 3.7 |
| 4 | जर्मनी | 3.8 | 3.5 |
| 5 | जापान | 3.1 | 2.7 |
| 6 | स्विट्जरलैंड | 2.6 | 3.3 |
| 7 | हांगकांग | 3.3 | 2.8 |
| 8 | संयुक्त अरब अमिरात | 5.1 | `6.2 |
| 9 | चीन | 4.9 | 6.1 |
| 10 | सिंगापूर | 3.0 | 3.4 |
| 11 | मलेशिया | 2.1 | 1.7 |
| | एकूण | 48.1 | 48.0 |

स्त्रोत - प्रतियोगिता सिरीज

सन 2004-05 मध्ये सेवा निर्यात 71% वाढून 46 बिलियन डॉलर झाले. वर्ष 2004-05 मध्ये सॉफ्टवेयर सेवेचे निर्यात 34.4% वाढून 17.2 बिलियन डॉलर झाले जे 2005-06 मध्ये आणखी वाढून 10.3 बिलियन डॉलर झाले.

विश्व बाजारात भारताचा IT सॉफ्टवेयर सेवेचा हिस 2003-04 मध्ये 1.7% पासून वाढून 2004-05 मध्ये 2.3% झाले.[37]

**संदर्भ** :-


1. ॲड. दिलीप डी. काकडे, जागतिकीकरणात डॉ. आंबेडकर, भुमीपूत्र प्रकाशन, पुणे 2002 पृ. १९
2. एस.के.मिश्र आणि वी.के.पूरी, भारती अर्थव्यवस्था, हिमालया प्रकाशन, नागपूर 2003 पृ. ५९२
3. संपादक, साहित्य भवन प्रतियोगिता सीरीज, भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टि में, साहित्य भवन पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, आगरा, २००६. पृ.27
4. एस.के.मिश्र आणि वी.के.पूरी, भारती अर्थव्यवस्था, हिमालया प्रकाशन, नागपूर 2003 पृ. ५९९
5. तत्रैव पृ. ५९९
6. तत्रैव पृ. ५९६
7. संपादक, साहित्य भवन प्रतियोगिता सीरीज, भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टि में,साहित्य भवन पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, आगरा, २००६. पृ.२८
8. एस.के.मिश्र आणि वी.के.पूरी, भारती अर्थव्यवस्था, हिमालया प्रकाशन, नागपूर 2003 पृ. 442
9. तत्रैव पृ. 442
10. तत्रैव पृ. 442

11. तत्रैव पृ. 443

12. संपादक, साहित्य भवन प्रतियोगिता सीरीज, भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टि में,साहित्य भवन पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, आगरा, २००६. पृ.11

13. तत्रैव पृ. 11

14 तत्रैव पृ. 12

15. एस.के.मिश्र आणि वी.के.पूरी, भारती अर्थव्यवस्था, हिमालया प्रकाशन, नागपूर 2003 पृ. 470

16. तत्रैव पृ. 472

17. संपादक, साहित्य भवन प्रतियोगिता सीरीज, भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टि में,साहित्य भवन पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, आगरा, २००६. पृ.12

18. तत्रैव पृ.13

19. एस.के.मिश्र आणि वी.के.पूरी, भारती अर्थव्यवस्था, हिमालया प्रकाशन, नागपूर 2003 पृ. ४८३

20. संपादक, साहित्य भवन प्रतियोगिता सीरीज,भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टि में साहित्य भवन पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, आगरा, २००६. पृ.13

21. एस.के.मिश्र आणि वी.के.पूरी, भारती अर्थव्यवस्था, हिमालया प्रकाशन, नागपूर 2003 पृ. २९७

22. संपादक, साहित्य भवन प्रतियोगिता सीरीज,भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टि में,साहित्य भवन पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, आगरा, २००६. पृ.९

23. तत्रैव पृ. 10

24. तत्रैव पृ. 37

25. तत्रैव पृ. 16

26. तत्रैव पृ. 17

27. एस.के.मिश्र आणि वी.के.पूरी, भारती अर्थव्यवस्था, हिमालया प्रकाशन, नागपूर 2003 पृ.663

28. तत्रैव पृ. 631

29 रूद्र दत्त, के.पी.एस.सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था, एस.चंद आणि कंपनी प्रकाशन, रामनगर, दिल्ली. 2006 पृ. ८५

30 तत्रैव पृ.८६

31 संपादक, साहित्य भवन प्रतियोगिता सीरीज, भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टि में,साहित्य भवन पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, आगरा, २००६. पृ. १८

32. तत्रैव पृ. १८

33. तत्रैव पृ. १९

34. रूद्र दत्त, के.पी.एस.सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था, एस.चंद आणि कंपनी प्रकाशन, रामनगर, दिल्ली. 2006 पृ.२३८

35. संपादक, साहित्य भवन प्रतियोगिता सीरीज, भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टि में,साहित्य भवन पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, आगरा, २००६. पृ.२५

36. तत्रैव पृ. २५

37. तत्रैव पृ. 26

2

# मुक्त आर्थिक धोरणामुळे निर्माण होणाऱ्या समस्या

आज जगात खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरणाची खूप चर्चा आहे. विश्व व्यापार संघटनेच्या (WTO) निर्मितीने जागतिक स्तरावरील व्यापाराला कोणत्याही सीमा राहिलेल्या नाहीत. आर्थिक आणि व्यापारी दृष्टिकोनातून जगात कोणताही सीमावाद निर्माण होणार नाही याची काळजी व करार विश्व व्यापारी संघटनेने केलेले आहेत. भारत ही त्यापैकी एक देश आहे. त्यामुळे भारतात ही या उदारीकरणाचे आणि 1991 साली स्वीकारलेल्या मुक्त आर्थिक धोरणाचे पडसाद उमटलेले आहेत. त्याचा परिणाम भारतातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि विशेषार्थाने आर्थिक क्षेत्रात जाणवत आहेत.

## अ) सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण :

मुक्त आर्थिक धोरणात सरकारी मालकीचे उद्योग खाजगी मालकांकडे सोपविणे म्हणजे खाजगीकरण होय. सरकारी उपक्रम यशस्वी होण्याकरिता महत्त्वाची अट म्हणजे सरकारची पूर्ण मक्तेदारी किंवा एकाधिकार असावयास हवा. स्पर्धक असू नयेत. पर्यायी व्यवस्था नसावी. भारतात पोस्ट सेवा, रेल्वे सेवा इ. सरकारी उपक्रमात सरकारची मक्तेदारी असेपर्यंत हे उपक्रम उत्तमप्रकारे चालले. परंतु ही मक्तेदारी संपल्याबरोबर सरकारी सेवा डगमगू लागल्या.

भारतीय कंपनी कायदा 1956 नुसार 50% च्या वर एखाद्या कंपनीचे भाग भांडवल गेले तर कंपनीला पूर्ण स्वातंत्र्य मिळते. राज्य समाजवादाचा पुरस्कार करणाऱ्या लोकांनी आणि राज्यकर्त्यांनी या कायद्यात बदल केले नाहीत. याउलट या कायद्याचा फायदा घेवून. माजी प्रधानमंत्री नरसिंहराव यांनी 1991 ला खाजगीकरणासंबंधीचे

बील संसदेत पास केले. या नव्या धोरणातील पहिले पाऊल म्हणून सरकारने आपल्या मालकीच्या उद्योगधंद्यातील भाग भांडवल (शेअर्स) विकायला सुरुवात केली.[1] या धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची संख्या 8 पर्यंत कमी करण्यात आली. सध्या फक्त 3 उद्योग सार्वजनिक क्षेत्राकडे आहेत.

## १) बाल्कोचे खाजगीकरण :

भारत ॲल्युमिनीयम कार्पोरेशन लि.मी. ही कंपनी सरकारी क्षेत्रातील एक उत्कृष्ट कंपनी होती. बाल्को ही आशियातील ॲल्युमिनीयमची निर्मिती करणारी सर्वात मोठी कंपनी होती. तिची प्रतिवर्षी ॲल्युमिनीयम निर्यातीची क्षमता 1 लाख टन एवढी होती. ॲल्युमिनीयमच्या निर्मितीचा खर्च जगात सर्वात कमी होता. बाल्कोचा विकास दर प्रतिवर्षी 60% एवढा होता तसेच राष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्कृष्ट निर्यातीचा पुरस्कार ही तिला मिळाला असतांना सरकारने तिचे खाजगीकरण केले.[2]

सन 1999-2000 मध्ये बाल्कोचा निव्वळ नफा 640 कोटी रु. होता. तिची एकूण निव्वळ मालमत्ता 3300 कोटी रु. ची आणि 720 मेगावॅट क्षमतेचा वीजनिर्मिती प्रकल्प होता.[3] भारतातील आणि जगातील कोणत्याही खाजगी क्षेत्रातील कंपनीला आव्हान देणारी तिची कामगिरी असतांना भारत सरकारने मुक्त धोरणाच्या अंमलबजावणी खातीर बाल्कोचे 51% भाग स्टरलाईट इंडस्ट्रीला विकण्यात आले. त्याचा परिणाम तेथील कामगारांवर झाला कारण बाल्कोचे खाजगीकरण होताच 3 मार्च 2001 रोजी पासून तेथील 7000 कामगार बेमुदत संपावर गेलेत. या खाजगीकरणाला भारतीय ट्रेड युनियन फेडरेशनने विरोध केला होता कारण कंपनीचे भाग भांडवल काळ्या यादीतील कंपनीला विकण्यात आले.[4]

## २) इतर कंपन्यांचे खाजगीकरण :

केंद्र सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील शासकीय भांडवल काढून एअर इंडिया, इंडियन एअरलाईन्स, मारुती उद्योग, स्टील ॲथारिटी ऑफ इंडिया इ. उद्योग खाजगी उद्योजकांना विकले. 5 फेब्रुवारी 2002 रोजी सरकारने दोन मोठ्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाच्या भागाची खाजगी क्षेत्रात विक्री केली. विदेशी संचार

निगमच्या (VSNL) 25% भागाची टाटाच्या पेनाटॉल फिन्वेस्ट कंपनीला विक्री केली. LBP च्या 33.58% भागाची दुसऱ्या खाजगी कंपनीला विक्री केली. त्याचवेळी सार्वजनिक क्षेत्रातील इतर चार उपक्रमांची विक्री करण्यात आली.

1) मुंबईचे सेन्टॉर एअरपोर्ट हॉटेल दिल्लीच्या रॅडिसन के.ए.एल. बत्राला 83 कोटी रु. ला विकले.

2) दिल्लीचे लोधी हॉटेल सिंगापूरच्या सिल्व्हर लिंक होल्डिंग्जल 76.22 कोटी रु. ला विकले.

3) भारतीय पर्यटन विकास निगमाचे भाग सुशील गुप्ता व सहकाऱ्याला 35.65 कोटी रु. ला विकले.

4) उदयपुरच्या लक्ष्मी विलास पॅलेस हॉटेलची विक्री भारत हॉटेलला 7.52 कोटी रुपयात विकण्यात आले.

तसेच हिंदुस्थान झिंक लिमिटेडच्या 26% भागाची विक्री स्टरलाईट समूहाला करण्यात आली.[5]

मुक्त आर्थिक धोरणाच्या माध्यमातून निर्गुंतवणूक धोरणाची अंमलबजावणी झाल्यापासून सरकारला फक्त 1991-92, 1994-95, 1998-99 आणि 2003-04 या चार वर्षातच उद्दिष्टांची पूर्तता करता आली. इतर वर्षातील निर्गुंतवणुकीपासून देशाचे नुकसानच झालेले आहे.

**सार्वजनिक क्षेत्रातील निर्गुंतवणूक (कोटी रु.)**

| **वर्ष** | **एकूण कंपन्या** | **उद्दिष्ट** | **प्राप्ती** |
|---|---|---|---|
| 1991-92 | 47 | 2500 | 3038 |
| 1992-93 | 35 | 2500 | 1913 |
| 1993-94 | 7 | 3500 | - |
| 1994-95 | 13 | 4000 | 4843 |
| 1995-96 | 5 | 7000 | 362 |
| 1996-97 | 1 | 5000 | 380 |

| | | | |
|---|---|---|---|
| 1997-98 | 1 | 4800 | 902 |
| 1998-99 | 5 | 5000 | 5371 |
| 1999-00 | 2 | 10000 | 1829 |
| 2000-01 | 4 | 10000 | 1869 |
| 2001-02 | 12 | 12000 | 5632 |
| 2002-03 | - | 12000 | 3348 |
| 2003-04 | - | 14500 | 15547 |
| 2004-05 | - | 4000 | 2765 |

स्त्रोत- डॉ.आर.वाय. माहोरे, खाजगीकरण आणि निर्गुंतवणूक (संशोधन पेपर)

सन 1991 पासून सार्वजनिक क्षेत्रात निर्गुंतवणुकीचे धोरण सुरू झाल्यापासून सरकारने केवळ बेरोजगारीत भर टाकली आहे. ओपन डोअर पॉलिसीचा अवलंब करून 1991-2004-05 पर्यंत विविध सार्वजनिक कंपन्यातून भांडवल काढून ते मातीमोल किंमतीला खाजगी क्षेत्रांकडे हस्तांतरित केले आहे. सरकारला ह्या निर्गुंतवणुकीपासून केवळ तोटाच सहन करावा लागला आहे. त्यामुळे आता मक्तेदारांचा नवा वर्ग निर्माण होत आहे.

सरकारला 2000-2001 पर्यंत निर्गुंतवणुकीबाबत 33% यश प्राप्त होऊ शकले. सरकारने 40 उपक्रमांच्या 18% ते 20% समभागाची निर्गुंतवणूक केली परंतु यापासून प्राप्त झालेले उत्पन्न सार्वजनिक क्षेत्रातील भांडवल गुंतवणुकीच्या 2% सुद्धा नाही.

## ३) शिपिंग कॉर्पोरेशनचे खाजगीकरण :

भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील अत्यंत लाभदायक नवरत्नांपैकी शिपिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया एक रत्न आहे. ही कंपनी भारतातील सर्वात मोठी जहाज वाहतुक कंपनी आहे. तिच्या

मालकीची शंभर जहाजे आहेत. याशिवाय ओ.एन.जी.सी. च्या 55 जहाजांचे व्यवस्थापन ही ह्याच कंपनीकडे आहे.

या कंपनीची नरिमन पॉईंटला एक एकोणवीस मजली इमारत आहे. तिची किंमत 500 कोटी रु. आहे. पवई येथे 57 एकड जमीन आहे. तिची किंमत अब्जावधी रु. आहे. याच भुखंडावर या कंपनीची मेरिट ईम ट्रेनिंग इन्स्टिटयूट आहे. इ.स. 1996-97 मध्ये या कंपनीची जी 2442 कोटी रु. उलाढाल होती ती इ.स. 2001 मध्ये 3132 कोटी रु. झाली.

कंपनीने गतवर्षी सरकारला 355 कोटी रुपयाचा कर भरला होता. गेल्या पाच वर्षात कंपनीने 12 हजार 890 कोटी रुपयांचे परकीय चलन प्राप्त केले आहे. 31 मार्च 2001 रोजी कंपनीच्या मालमत्तेचे मूल्य 5254 कोटी रु. होते असे असतांनाही मातीमोल भावाने खाजगीकरण करण्याचा विचार सुरू आहे.[6]

## ४) तेल कंपन्यांचे खाजगीकरण :

भौगोलिकदृष्ट्या भारत हा तेल उत्पादनाच्या बाबतीत कमनशीबी आढळतो. एकूण तेल उत्पादन क्षेत्रापैकी 0.4% क्षेत्र भारताच्या अखत्यारित येते. भारतात आजच्या घडीला 120 दशलक्ष टन तेल आणि नैसर्गिक गॅस आयात करावा लागतो. जगात भारत तेलाचा मोठा खरेदीदार बनला आहे. गेल्या 12 वर्षात भारतात तेलाची गरज मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ही गरज भागविण्यासाठी सर्वस्वी आयातींवर अवलंबून राहावे लागते. सन 1991 मध्ये जी आयात 30% होती ती आज 70% एवढी झालेली आहे.

भारत सरकारच्या अखत्यारित असणारे तेल उद्योग सरकारने खाजगी क्षेत्राकरिता खुले केले आहेत. त्यात 1. आय.बी.पी. 2. भारत पेट्रोलियन 3. इंडियन ऑईल 4. ओ.एन.जी.सी. मुख्य आहेत.[7]

भारत पेट्रोलियम ही भारतातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी कंपनी आहे. तिचे वसूल भांडवल 300 कोटी रु. आहे. भारत पेट्रोलियम सरकारला 400 कोटी रु.कर रूपाने देत होती. देशभरात

भारत पेट्रोलियमचे 5 हजार पेट्रोल पंप आहेत ते प्रत्येक 2 कोटी रु. किमतीचे तसेच 1345 द्रवरूप नैसर्गिक गॅस भरण्याचे पंप आहेत असे असतांनाही सरकारने तिचे खाजगीकरण केले.[8]

तेल कंपन्यांच्या खाजगीकरणामुळे भारतात तेलाच्या किंमतीवर फार मोठा परिणाम पडलेला आहे. आर्थिक वर्ष 2006-07 मध्ये तेल उत्पादन 6.6 वरून 0.4% पर्यंत म्हणजे - 6.2 पर्यंत आलेले आहे त्यामुळे किंमत वाढीला प्रोत्साहन मिळत आहे.

## ५) रेल्वेचे खाजगीकरण

जगात भारतीय रेल्वेचे जाळे दुसऱ्या क्रमांकावर आहे. रेल्वे सर्वसाधारण लोकांकरिता प्रवासाचा व मालवाहतुकीचा स्वस्त साधन आहे. रेल्वेला देशाची 'रक्तवाहिनी' संबोधले जाते. पूर्व प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांनी रेल्वेच्या खाजगीकरणासाठी अर्थ सल्लागार राकेश मोहन यांच्या अध्यक्षतेखाली एक कमेटी नेमली होती. गीता कृष्णन समितीने केंद्रीय कर्मचाऱ्यांमध्ये 4.5 लाख कर्मचारी अतिरिक्त असल्याचे सांगितले आहे.[9]

रेल्वे राज्यमंत्री दिग्विजयसिंह यांनी नवी मुंबईच्या तुर्भे यार्डात देशातील पहिल्या खाजगी मालगाडीला हिरवी झेंडी दाखवून नोव्हेंबर 2001 मध्ये रेल्वेच्या खाजगीकरणाला सुरुवात केली. रेल्वे ग्राहकांना मूल्याधिष्ठित आणि वेळेनुसार वाहतुक सेवा प्रदान करण्यासाठी खाजगी क्षेत्रासोबत युती केली आहे. पार्सल एक्सप्रेस सेवा प्रदान करण्यासाठी मध्य रेल्वे आणि खाजगी क्षेत्रातील 'गॅटी' या वाहतूक कंपनी दरम्यान संयुक्त उपक्रम सुरू झालेला आहे. या सेवेद्वारा ग्राहकांना स्वस्त दरात सेवा देण्यात येणार आहे.[10]

जागतिक बँकेचा भारताला सल्ला आहे की, रेल्वे उद्योगाचे तुकडे तुकडे करून हा उद्योग बहुराष्ट्रीय कंपन्यांना व देशी भांडवलदारांना विका.

रेल्वे अर्थसंकल्प 2006-07 नुसार भारतीय रेल्वे सध्या नफ्यात धावत आहे. सन 2006-07 मध्ये रेल्वेला 4772.82 करोड रु. नफा झालेला आहे.[11]

## ब) कृषीवर परिणाम

सन 1991 मध्ये देशाने मुक्त आर्थिक धोरणांचा अवलंब केला परंतु तेव्हा शेतीचा मुक्त अर्थव्यवस्थेत समावेश नव्हता. 1994 मध्ये जागतिक पातळीवर शेतीचे मुक्त धोरण आणि 'उरुग्वे' वाटाघाटीत GATT गॅट करार अस्तित्वात आला. नंतर मेक्सिको येथे 18 एप्रिल 1994 रोजी मंत्री पातळीवर या मुद्याला मान्यता देण्यात आली. येथे प्रथमच शेती व्यापार जागतिक पातळीवर मुक्त करण्याचे धोरण ठरले. भारताने ही या करारावर सह्या केल्या. 1 जानेवारी 1995 पासून करार कार्यान्वित झाला. यात शेती क्षेत्राचा समावेश 'जागतिक व्यापार संघटनेत' करण्यात आला.

## १) जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीचे शेतीविषयी धोरण

जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्थेचा शेती क्षेत्रावर अतिशय वाईट परिणाम होत असल्याची चिन्हे दिसू लागली आहेत. विश्व बँक व आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीने थोपविलेल्या नितीचा तो परिणाम आहे. आतापर्यंत विविध प्रकारचे नियम या संस्थामार्फत लागू करण्यात आले आहेत. त्यात -

1) सिंचन, वीज व कर्जाची सवलत हळूहळू बंद करणे.
2) शेती क्षेत्रावरील सर्व प्रतिबंध हटविणे.
3) शेती क्षेत्राकरिता एकच मूल्यव्यवस्था लागू करणे.
4) खाद्य वस्तूवरील सवलती बंद करणे.
5) उत्पादन व विक्रीवरील प्रतिबंध हटविणे.
6) शेती संबंधित व्यापारी संस्थांना मुक्त प्रवेश.
7) भूमी-सीमा संबंधी कायद्याची समाप्ती.[12]

W.T.O. च्या रिपोर्टनुसार कृषी उत्पादन, उपभोग व विक्रीच्या प्रत्येक क्षेत्रात सरकारी हस्तक्षेपामुळे जास्त अयोग्यता व उत्पादन नफा कमी झालेला आहे. शेवटी रिपोर्टमध्ये दावा करण्यात आला आहे की, उदारीकरणात सगळ्यांचा फायदास होईल. शेती क्षेत्रात सुधारणा घडविणाऱ्या नरसिंहम समितीने सार्वजनिक बँकांना कृषी क्षेत्रात दिल्या जाणाऱ्या कर्जात मोठ्या प्रमाणात कपात

करण्याची सूचना दिली व सल्ला दिला की 40% ऐवजी 10% कर्ज शेती क्षेत्रासाठी द्यावे.[13]

याचा एकूणच परिणाम हा शेती क्षेत्रातील उत्पादकतेवर दिसत आहे.

## २) जागतिक व्यापार संघटना - W.T.O.

1 जानेवारी 1995 रोजी WTO च्या माध्यमातून शेती क्षेत्रावर विविध बंधने लादण्यास सुरुवात झाली. WTO चा भारतीय शेतीबाबतचा दृष्टिकोन बघितला तर जाणवते की, शेतीवरील सबसिडी कमी करून जागतिक बाजारपेठेत भारतीय मालाच्या किंमती वाढवून गरीब शेतकऱ्यांना दरिद्री बनविणे हाच राहिला आहे.

भारत आणि अमेरिकेने 16 डिसेंबर 1999 च्या सुमारास एक कृषी विषयक करार केला. जेव्हा या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या त्यावेळी भारतीय संसदेचे अधिवेशन सुरू होते असे असतांनाही या कराराची चर्चा संसदेत करण्यात आली नाही. कराराप्रमाणे भारतीय आयातीवरील संख्यात्मक निर्बंध सन 2003 मध्ये रद्द करण्यात यावे असे ठरविण्यात आले. त्याचाच परिणाम म्हणून भारताने 715 वस्तूंवरील संख्यात्मक निर्बंध दूर केली आहेत.[14]

हा करार एवढा जाचक आणि भारतीय शेतकऱ्यांच्या हितसंबंधाला बाधा आणणारा होता की, तो जर भारतीय जनतेला माहित झाला तर त्यातून जनक्षोभ उसळेल हे होऊ नये यासाठीच सरकारने हा करार जनतेपासून दडवून ठेवला.

शेतमालाच्या उदारीकरणामुळे अन्नधान्याच्या सुरक्षिततेची हमी धोक्यात आली आहे. जैविक विविधतेचा ऱ्हास होऊन नैसर्गिक प्रणालीतील टॉक्झिक व जनुकी प्रदूषण वाढत आहे.

### i) आयातीचे उदारीकरण

शेती कराराअंतर्गत बाजारपेठेत पोहोच नियमानुसार जकातीत घट करण्यात आली. भारताला 2003 पर्यंत आयातीवरील निर्बंध दूर करावयाचे असतांना भारताने 31 मार्च 2001 पूर्वीच निर्बंध संपुष्टात आणले. भारताने आयात जकाती घटविण्याबाबत आवश्यकतेपेक्षा जास्त घाई केल्यामुळे त्याचे दुष्परिणाम शेतकरी

आणि भारतीय शेतीला भोगावे लागत आहेत. उत्तरेकडील श्रीमंत देशात आयातीवर 100 ते 300% जकाती असतांना आपल्या देशात ते नगण्य आहेत.

आयातीच्या उदारीकरणामुळे सोयाबीन तेलाच्या आयातीचे प्रमाण वाढले त्यामुळे आयातीत तेल वापरण्याचे प्रमाण 1998-99 मध्ये 12% वरून 45% झाले. यातील बहुतांश आयात अमेरिकेकडून करण्यात आली.[15]

अमेरिकेतून भारतात मोठ्या प्रमाणात धान्याची आयात होत आहे. त्यावर 'कार्जिलसारख्या' मोठ्या कंपन्याचे वर्चस्व आहे. त्यांना अमेरिकेत मोठ्या प्रमाणात सबसिडी दिली जाते. त्यामुळे या कंपन्या कृत्रिमरित्या किंमत कमी ठेवतात. परिणामता स्थानिक उत्पादनाला मागणी राहत नाही.

## ii) निर्यातीचे उदारीकरण

भारतात व्यापार विषयक उदारीकरण धोरण जाहीर करण्यात आले तेव्हा कृषी सचिवांनी असे म्हटले की, ''अन्नाची हमी गोदामातील अन्नधान्याच्या साठ्यावर अवलंबून नसून ती खिशात असलेल्या पैशावर अवलंबून असते. अन्नाची हमी स्वयंपूर्णतेवर अवलंबून नसून स्वावलंबनावर अवलंबून असते.''[16]

जागतिक व्यापार संघटनेचे नियम स्वीकारतांना शेतमालाची निर्यात वाढेल असे सांगण्यात आले. परंतु भारतीय शेतमालाची निर्यात वाढलेली नाही. सन 1996-97 मध्ये निर्यातीत शेतमालाचे प्रमाण 17.96% होते. ते 2002-03 मध्ये 12.8% तर ऑक्टोबर 2005-06 मध्ये 9.9% पर्यंत कमी झाली. भारतात कृषी विषयक धोरणात देशांतर्गत अन्नधान्याला कमी महत्त्व देण्यात आले. तर सागरी उत्पादने आणि फलोत्पादनाच्या निर्यातीवर जास्त भर देण्यात आला.[17]

फळे, मांस आणि भाजीपाला इ.च्या निर्यातीपासून प्राप्त होणारे उत्पन्न हे उत्पादन खर्चापेक्षा बरेच कमी आहे. सुरुवातीला लहान प्रमाणावरील शेतीमध्ये जनावरांपासून इतर अनेक पर्यावरण विषयक फायदे मिळत होते ते आता नामशेष होत आहेत.

जनावरांना जगू दिले तर कत्तलखान्याच्या उत्पन्नापेक्षा 5 पट जास्त उत्पन्न मिळत असते. पुष्प शेतीच्या निर्यातीवरून एक अंदाज आहे की, आयातीवरील खर्च 13.7 अब्ज रु. तर निर्यातीपासून मिळणारे उत्पन्न 3 अब्ज रु. आहे म्हणजेच या व्यवहारात एकूण 10 अब्ज रु. चा तोटा होत आहे.[18]

## iii) पेटंट कायदा (बौद्धिक संपदा हक्क)

गॅटच्या उरुग्वे फेरीत ट्रिप्स नुसार पेटंट, कॉपी राईट, ट्रेडमार्क या बाबतीत नियम तयार केले असून ते बंधनकारक आहेत. ट्रिप्सचे नियम सजीवांना लागू होत असल्यामुळे जनूके, पेशी, बियाणे, वनस्पती व प्राणी यासंबंधी पेटंट प्रस्ताव करता येतो. WTO ने सदोष पेटंट पद्धती संपूर्ण जगभर लादली आहे. सजीव पेटंटचे विकृत प्रकार -

### 1) नैतिक विकृती

बियाणे, वनस्पती, शेळ्या-मेंढ्या, गाई-म्हशी व मानवी पेशी उपजत आहेत. त्यांची निर्मिती कोणत्याही कंपनीने केलेली नाही. त्यामुळे त्यासंबंधी पेटंट धारकाला हक्क देणे योग्य ठरत नाही.

### 2) बियाण्यांचा संग्रह गुन्हा

बौद्धिक संपदा हक्कामुळे कंपन्यांना बियाण्याचे मालक म्हणून मान्यता मिळाली. ट्रिप्स नुसार शेतकऱ्यांनी जर स्वत% धान्य भरून ठेवले तर ती चोरी मानली जाईल. जर एखादा शेतकरी असे करीत असेल तर त्यावर मोन्सॉन्टो कंपनीचे हेर लक्ष ठेवतील.

### 3) जैविक लुबाडणूक

जैविक विविधता आणि स्वदेशी ज्ञान याची पेंटटच्या माध्यमातून चोरी करणे ही जैविक लुबाडणूक होय. ह्या माध्यमातून 67% गरीब जनतेची लुबाडणूक होत आहे.[19]

ट्रिप्स करारामुळे दक्षिणेकडील जैविक विविधतेची आणि लोकांच्या अधिकाराची फार मोठी हानी होणार आहे. गरीबांना अशा ज्ञानाचा व साधनांचा वापर करतांना रॉयल्टी द्यावी लागणार आहे. त्यांच्या परवानगीशिवाय वापर केल्यास शिक्षा भोगावी लागणार आहे.

भारतीय शेतकरी, परंपरागत व्यवसायिक आणि व्यापाऱ्यांना स्थानिक, राष्ट्रीय आणि जागतिक बाजारपेठेतील आपला हिस्सा गमवावा लागेल.

जैव अभियांत्रिकीद्वारा तयार केलेल्या 80% बियाण्यावर 'मोन्सेन्टो' कंपनीची बौद्धिक मालमत्ता हक्क आहे. आता बी.टी. कॉटनची बियाणे पुन्हा-पुन्हा खरेदी करावी लागणार आहेत.

## iv) पाण्यावर मक्तेदारी

राज्य शासनाने कृष्णा, गोदावरी, तापी इ. विकास महामंडळे स्थापन करून पाटबंधारे खात्याच्या अखत्यारितील सिंचन व्यवस्थेचे खाजगीकरण करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू केलेली आहे. पिण्याच्या पाण्याचे खाजगीकरण करण्यासाठी समिती नेमली आहे.

पाण्याचे खाजगीकरण झाले तर पाण्याचे दर मोठ्या प्रमाणात वाढून कालव्याचे पाणी शेतकऱ्यांना परवडणार नाही. परिणामी धान्य, डाळी, तेलबियांचे उत्पादन घटून गरीब जनतेला अन्नधान्य परवडेनासे होऊन उपासमारीच्या संकटाने देश वेढला जाईल.[20]

आता पाण्यावर आधारीत अर्थव्यवस्था निर्माण होणाऱ्याची चिन्हे दिसत आहेत. पाण्याच्या बँका (Water Bank) स्थापन होतील. पाणी सम्राट (Water Lord) तयार होतील. आता श्रीमंत राष्ट्रे बॅटर बँका स्थापण्याचा तयारीला लागलेली आहेत.[21]

सध्या देशाची अर्थव्यवस्था उभी आहे ती शेतीवर आणि शेती उभी आहे ती पाण्यावर आणि जर हेच पाणी धनदांडग्यांच्या मुठीत गेले तर भारतीय शेतकऱ्यांना दुसरे दैवतच राहणार नाही.

## ३) सेझ SEZ

मुक्त आर्थिक धोरणाची दुसरी पिढी म्हणजे 'सेझ' होय. सेझ ही अशी व्यवस्था आहे की, ज्यात राज्य आणि केंद्र शासनाचा कुठलाही हस्तक्षेप राहणार नाही. याच कारणास्तव सेझला एक स्वतंत्र नियंत्रण व्यवस्था संबोधण्यात आले आहे. जिची स्वत%ची खाजगी मालकी असेल आणि राज्यव्यवस्था ही तिला नियंत्रित करू शकणार नाही.

एप्रिल 2000 मध्ये सेझ पॉलिसीचा प्रस्ताव भारतात ठेवण्यात आला. महाराष्ट्रात सेझ अधिनियम 2003 मध्ये लागू करण्यात आली आणि 2005 मध्ये सेझ बिल पास करण्यात आले.[22]

भारत हा कृषीप्रधान देश आहे. कृषी केंद्रीत अर्थव्यवस्थेमुळेच भारताचा विकास होणे शक्य आहे. कारण जगात भारत आणि ब्राझील असे दोनच देश आहेत की, त्यांच्या भौगोलिक वैविध्यतेमुळे, कोणत्याही पिकास अनुकूल वातावरण असून कृषी क्षेत्रात प्रगती करून संपूर्ण जगाला अन्न पुरवठा करण्याची ताकद या दोन देशामध्ये आहे. परंतु या दोन्ही देशाबाबत उलटेच कालचक्र मागे लागले आहे.[23]

भारतात सिंगूर आणि नंदीग्राम हा सेझ आणि मुक्त अर्थव्यवस्थेचा परिणाम आहे. सेझ करिता जमीन अधिग्रहण करतेवेळी शहरांना लक्ष केल्या जात आहे. शहरांच्या आसपासची सुपीक जमीन कंपन्यांना हवी आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना बाजार मूल्यावर आधारित किंमत देवून जमीन खेरदी करीत असले तरी शेतकऱ्यांसाठी तो तोट्याचाच सौदा आहे. कारण अचानक आलेला पैसा शेतकऱ्यांना पचविता येणार नाही. तो पैसा वाममार्गाला लावून शेवटी शेतकरी कंगाल होणार आहे.

मृणाल गोरे आणि न्या. प. बा. सावंत यांनी केलेल्या अभ्यासानुसार बृहन्मुबंईच्या जमीन व्यवहाराची माहिती आश्चर्यकारक आहे -

1) सात मोठ्या जमीनधारकांकडे 12,926 एकड जमीन आहे.
2) 338 मोठ्या जमीनधारकांकडे 17,097 एकड जमीन आहे.

मोठ्या जमीनधारकांची 30,023 एकड जमीन असेल तर एकूण जमीनीत सर्वसामान्यांचा वाटा किती असेल ते समजूनच येते.

सिताराम येचुरी यांनी दिलेल्या माहितीनुसार महाराष्ट्र सरकारने 50,000 रु. प्रती हेक्टर ने शेतकऱ्यांकडून जमीन विकत घेऊन ती जमीन दर हेक्टरी 62 लाखाला एका कंपनीला विकली. पुढे यांचा कंपनीने ती जमीन 'सेझ' साठी 10 कोटी प्रती हेक्टर भावाने विकली.[24] यावरून सरकार शेतकऱ्यांचा किती हितचिंतक आहे ते कळते.

'सेझ' वर देशभरातून विरोध होत आहे. ओरिसातील कलिंग नगराला आदिवासींनी केलेल्या विरोधानंतर बंदुकीच्या गोळीने 12 लोकांना ठार मारून टाकण्यात आले. हे 'सेझ' चे पहिले बळी होते.

चीन देशाच्या सेझचे सत्य दर्शन 'विल द बोट सिंग द वाटर्स ?' या पुस्तकातून दिसून येते. तेथील शेतकरी सेझमुळे कसे भुकेकंगाल झाले आहेत याची सत्य परिस्थिती त्या ग्रंथात आहे. त्यामुळे चीन सरकारने त्या ग्रंथावर बंदी घातली आहे.[25]

आज सेझ खाली संपूर्ण भारतात 5,50,000 एकड जमीन अधिग्रहित करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर निश्चितच भीख मागण्याची पाळी येणार आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात सुपीक जमीन सेझ व्याप्त झाली तर कृषीवर अवलंबून असणाऱ्या असंख्य लोकांचे काय होईल?

सन 1983-94 वर्षाचा विचार केल्यास कृषी क्षेत्राचे खाजगीकरण झालेले नव्हते. परंतु कृषी क्षेत्राचा समावेश WTO मध्ये करून सरकारने या क्षेत्रातील बेरोजगारीत भर टाकली आहे. त्याचप्रमणे या मुक्त धोरणाचा प्रभाव खनन क्षेत्र, पाणी पुरवठा क्षेत्रावर ही झालेला आहे. वैयक्तिक सेवा देणाऱ्या संस्था आज बंद होत चालल्या आहेत आणि त्यातूनही बेरोजगारांची मोठी फौज निर्माण होत आहे. भारतासारख्या दाट लोकसंख्या असलेल्या देशात 'सेझ' किती रोजगार उपलब्ध करू शकेल याची शाश्वती नाही अशा अनेक समस्या ह्या सेझमुळे निर्माण होत आहेत आणि त्याचे उत्तर आपल्या राज्यकर्त्यांकडे नाही. शेवटी शेतकऱ्यांना अगणित यातना सोसाव्या लागणार आहेत हे निश्चित !

## क) कर्मचारी व कामगार (रोजगार)

मुक्त आर्थिक धोरणांच्या अंमलबजावणीमुळे जागतिक बँकेने कर्ज देतांना केंद्र व राज्य शासनाला नोकर कपातीची अट घातली होती. त्यासाठी खाजगीकरण करा असा आदेश आहे. जागतिक बँकेच्या दबावाखाली आज राज्याराज्यात खाजगीकरण, कंत्राटीकरण, वेतन व भत्ते गोठविण्याच्या स्वरूपात कामगार कपातीचे धोरण युद्ध पातळीवर सुरू आहेत.

आशिया खंडातील विकासाचा दर वाढत आहे परंतु रोजगार मात्र कमी होत आहे. ह्यावर आशिया विकास बँकेचे मुख्य अर्थशास्त्रज्ञ अफजल अली म्हणतात की, ‘‘सशक्त आर्थिक वाढ बेरोजगारीच्या समस्या सोडविण्यासाठी वाढत असली तरी बेरोजगारी उग्र रूप धारण करीत आहे.’’[26]

भारतातील एकंदर बेरोजगारीचा अभ्यास केल्यास दिसून येते की, 1993-94 पासून देशात बेरोजगारीचे प्रमाण वाढत चालले आहे. ग्रामीण भागात पुरुषांच्या बेरोजगारीचे प्रमाण 1993 - 94 मध्ये 5.6 % वरून 2004 मध्ये
9.0% आणि शहरी भागात 6.7% वरून 8.1% पर्यंत वाढत चालले आहे. महिला बेरोजगारीचा विचार केल्यास ग्रामीण भागात 1993-94 मध्ये 5.6% वरून 2004 पर्यंत 9.3% तर शहरी भागात 10.5% वरून 11.7 पर्यंत वाढत आहे.[27]

गेल्या 10 वर्षापासून शासनातील कर्मचारी भरतीवर बंदी आणण्यात अली आहे. त्यामुळे कल्याणकारी योजना राबवितांना सरकारला अपयश येत आहे. सरकारी धोरणानुसार रिक्त पदे न भरता ती रद्द करण्यात येत आहेत.

मुक्त धोरणात माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे उत्पादन करण्यावर भर देण्यात येत असल्याने कामगार कपातीची प्रक्रिया सुरू झालेली आहे. त्याचाच एक भाग म्हणजे ‘सोनेरी हस्तांदोलन’ होय. या योजनेखाली 5 लाख कर्मचाऱ्यांना निवृत्त करण्यात आले. त्यात 105 सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचा समावेश होता. निवृत्तीसाठी सरासरी 2.50 लाख रु. इतकी कमी धनराशी देण्यात आली.[28]

22 फेब्रुवारी 2002 रोजी कामगार क्षेत्रातील आमूलाग्र बदलाचा भाग म्हणून केंद्र सरकारने 1 हजार पर्यंत कामगार असलेले पण आर्थिकदृष्टचा तोटचात असलेले उद्योग बंद करण्याची किंवा कर्मचारी कपात करणाऱ्या धोरणाला मंजुरी दिली.[29]

**क्षेत्रानुसार रोजगारी स्थिती**

| क्षेत्र | 1983-94 | 1994-2000 |
|---|---|---|
| 1) कृषी | 1.51 | -0.34 |
| 2) खनन क्षेत्र | 4.16 | -2.85 |
| 3) विद्युत व पाणी पुरवठा | 4.50 | -0.88 |
| 4) वित्तीय सेवा | 7.18 | 6.20 |
| 5) वैयक्तिक सेवा | 2.90 | 0.55 |

स्त्रोत उदधृत, भारतीय अर्थव्यवस्था, पृ. 252

मुक्त धोरणांच्या अंमलबजावणीकरिता सरकारने श्रमिक विरोधी मान्यता दिली आहे. त्यात -

1) रोजगार संकुचन करणे.

2) एकूण रोजगार वाढविण्यासाठी श्रमिकांवर दबाव टाकणे.

3) महागाई भत्ता व पेंशन योजना बंद करणे.

4) 'न काम न पगार' तत्व राबविणे.

5) औद्योगिक विवाद कायद्याचे उल्लंघन करून कामगारांवर सक्ती करणे.

6) श्रमिक संघटनेला कमजोर बनविणे.[30]

मुक्त आर्थिक धोरणामुळे बेरोजगारी, कमी मजुरी, अंशकालीन नोकरी, असुरक्षित रोजगार निर्माण होत आहे. सन 1991-2000 पर्यंत ताळेबंदीमुळे 60.8% आणि संपामुळे 39.2% मानव दिवसांचे नुकसान झाले. त्यामुळे श्रम, वेळ व उत्पादनाची मोठ्या प्रमाणात हानी झाली.

## ड) शिक्षण

सन 1990 ला जोमतीयन संमेलन (थायलंड) मध्ये भारतीय शिक्षणाच्या इतिहासाला एक नवे वळण मिळाले. या संमेलनानंतर भारतीय संविधानाची जागा बाजार आधारित निती नियमांनी घेतली आणि भारत सरकारची जागा विश्व बँकेने घेतली. जोमतीयन संमेलनात (1990) अनेक देशासोबत भारताने सुद्धा करारावर स्वाक्षरी केली. यात लहान मुलांना शिक्षण देण्यासाठी आंतरराष्ट्रीय मदत घेण्याची तरतूद होती.

जागतिक बँक आणि इतर संस्थांना प्राथमिक शिक्षणात हस्तक्षेपाला निमंत्रण देण्याचा परिणाम असा झाला की 1993 मध्ये देशातील 42 जिल्ह्यामध्ये सुरू झालेला जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम देशभरातील 149 जिल्ह्यात सुरू करण्यात आला. त्याकरिता विश्व बँक व इतर संस्थांकडून 2,500 करोड रु. कर्ज घेण्यात आले.[31]

1 जानेवारी 2005 पासून अंमलात आलेल्या GATS करारात शिक्षण सेवेच्या खाजगीकरणाचा पुरस्कार करण्यात आला. त्यामुळे भारतात आता विदेशी विद्यापीठे स्थापन होत आहेत. सध्या भारतात 21 देशांनी आपापली विद्यापीठे स्थापन केलेली आहेत.[32]

गुणवत्ता (Quality) आणि अधि स्वीकृती (Accreditation) या दोन बाबी शिक्षण व्यापाराच्या वादाचा केंद्रबिंदू आहेत. GATS च्या चौकटीचे महत्त्वाचे घटक म्हणजे परवाना, अधिस्वीकृती, पात्रता, मान्यता आणि गुणवत्ता आश्वासन होत. हे घटक शिक्षणाच्या आयात व निर्यातीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. विकसनशील देश याबाबत साशंक असल्यामुळे त्यांना शिक्षण सेवांच्या व्यापारापासून फायदे मिळू शकत नाहीत. ते आपल्या देशाच्या सीमेपलिकडे शिक्षण सेवा प्रदान करू शकत नाहीत.[33]

A Policy Framework of Reforms in Education' हा रिपोर्ट पंतप्रधानाच्या कार्यालयाकरिता उद्योगपती मुकेश अंबानी व कुमारमंगलम बिर्ला यांनी तयार केला. तसेच मानव संसाधन मंत्रालयाकडे टेक्नीकल एज्युकेशन चालविण्याचा प्रस्ताव दिला.[34]

भारतातील 214 विद्यापीठे, 16 केंद्रीय विद्यापीठे 28 Deemed Universities हजारो महाविद्यालये निधी अभावी भंग पावत आहेत. महाराष्ट्रात ही विद्यापीठे व महाविद्यालयासमोर हाच प्रश्न उभा आहे.

## इ) अन्न

देशातील अन्नधान्य महामंडळाची गोदामे खच्चून भरली असतांनाही ओरिसा, बिहार आणि महाराष्ट्र व इतरही राज्यात भुखबळी पडत आहेत. दुर्गम भागातील आदिवासी कुपोषितच आहेत. मुक्त आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे ग्रामीण

भागातील जनतेत पोटापुरते अन्न विकत घेऊन ते खाण्याची क्रयशक्ती उरलेली नाही. रोजगार नाही तर पैसे नाही आणि पैसे नाही तर अन्न नाही म्हणून भूक भागविता येत नाही. सरकारने यातील रोजगारच कमी करून भुखबळीला पोषक वातावरण निर्माण केले आहे.

मुक्त धोरणात स्वस्त धान्य वितरण प्रणालीला मोठा आघात पोहचलेला आहे. ओरिसातील काशीपूर आणि महाराष्ट्रातील मेळघाट हे गाव कुपोषणासाठी गाजले आहेत. केंद्र सरकारने 1999 पर्यंत असलेली अन्नधान्यावरील अनुदानाची तरतूद 8 हजार कोटी रुपयांवरून 14 हजार कोटी रु. वर नेली परंतु खेदाची गोष्ट म्हणजे या पैशातील अन्नाचा एक दाना ही कुपोषितांच्या पोटात गेला नाही.[35]

आश्चर्याची गोष्ट म्हणजे सरकारी आकडेवारी पूर्णत% वेगवेगळी आढळून येते. राज्याराज्यात एकीकडे भुखबळी पडत असतांना दुसरीकडे सरकारकडे धान्य साठवायला जागा नाही. ते उघड्यावर खराब होऊ नये म्हणून कमी किंमतीला निर्यात केले जाते आणि यावर 400 कोटी रु. सबसिडी दिली जाते असे असतांनाही आता आम्ही निर्यात करू लागलो म्हणून सरकार स्वत%चीच पाठ थोपटून घेते.[36]

मुक्त धोरणाच्या माध्यमातून सरकारने आता अन्नधान्य महामंडळाच्या माध्यमातून धान्य साठा मर्यादित ठेवण्याचे धोरण स्वीकारले आहे आणि रास्त धान्य प्रणाली मोडीत निघाल्याने धान्याची कृत्रिम टंचाई निर्माण होत आहे.

सबसिडी कपात आणि अन्नधान्य भाववाढ यांच्यामुळे वाढलेले दारिद्रच हे मुख्यत% ग्रामीण भागात आहे. ब्रेटनवुड्स संस्थांनी कर्ज घेणाऱ्या देशांमध्ये अन्नधान्य सबसिडी ही विशिष्ट वर्गाकरिता सिमीत करण्यावर भर दिला आहे. त्यामुळे गरिबांना स्वस्त धान्य दुकानातून अन्न मिळणे कठीण झाले आहे. जागतिकीकरणात गरीब कंगाल होत आहेत. सबसिडी बंद करण्यामागे साम्राज्यवादी शक्तींचे मोठे षडयंत्र आहे. सबसिडी बंद केल्याने अन्नधान्याच्या किंमती वाढत आहेत जे सामान्य वर्गाला परवडणारे नाही.[37]

## संदर्भ


1 पुरूशोत्तम लांडगे, डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरणः एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२. पृ.४५

2 ॲडमिरल विष्णू भागवत, जागतिकीकरण नविन गुलामगिरी, समता प्रकाशन, नागपूर २००६. पृ. १५४

3 तत्रैव पृ. १५५

4 पुरूशोत्तम लांडगे, डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२. पृ.47

5 डॉ. आर. वाय. माहोरे, खाजगीकरण आणि निर्गुंतवणुक धोरण.(शोधनिबंध) नागपूर विद्यापीठ, नागपूर.

6 ॲडमिरल विष्णू भागवत, जागतिकीकरण नविन गुलामगिरी, समता प्रकाशन, नागपूर २००६. पृ. १५७

7 ॲड. दिलीप डी. काकडे, मुक्त अर्थव्यवस्थेत बहुजन समाजाचे भवितव्य, टेहळणी प्रकाशन, पुणे 2003 पृ. ५१

8 ॲडमिरल विष्णू भागवत, जागतिकीकरण नविन गुलामगिरी, समता प्रकाशन, नागपूर २००६. पृ. 144

9 पुरूशोत्तम लांडगे, डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२. पृ.४८

10 तत्रैव पृ. ५०

11 संपादक, साहित्य भवन प्रतियोगिता सीरीज, भारतीय अर्थव्यवस्था दृष्टि में, साहित्य भवन पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, आगरा, २००६. पृ.33

12 पुरूशोत्तम लांडगे, डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२. पृ.५७

13 तत्रैव पृ. ५८

14 संपादक, योजना , भारताला शाश्वत कृषी विकासाची गरज, जुलै 2004 प्रकाशक योजना कार्यालय, मुंबई पृ. 22

15 डॉ. आर. वाय. माहोरे, जागतिक व्यापार संघटना आणि सेवांच्या व्यापारासबंधी सामान्य करार.(शोधनिबंध) नागपूर विद्यापीठ, नागपूर.
16 तत्रैव
17 संपादक, साहित्य भवन प्रतियोगिता सीरीज,भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टि में, साहित्य भवन पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, आगरा, २००६. पृ. 26
18 डॉ. आर. वाय. माहोरे, जागतिक व्यापार संघटना आणि सेवांच्या व्यापारासबंधी सामान्य करार.(शोधनिबंध) नागपूर विद्यापीठ, नागपूर.
19 तत्रैव
20 सुलभा ब्रम्हे, गॅट करार गुलामीच्या नव्या शृंखला, धनंजय गाडगीळ जन्मशताब्दी प्रबोधनमाला ,पुणे 2001 पृ. 17
21 उत्तम कांबळे, जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न, सुगावा प्रकाशन पुणे, २००२. पृ. १८
22 चित्रलेखा कौसल, सेझ, शून्यदीप प्रकाशन, नागपूर २००७. पृ. 6
23 तत्रैव पृ. १९
24 तत्रैव पृ. 24
25 तत्रैव पृ. 24
26 डॉ. त्रीलोक हजारे, मुखपत्र श्रमीक उर्जा, भारतातील विषमता व बेरोजगारी प्रकाशन 2007 पृ. १९७
27 संपादक, साहित्य भवन प्रतियोगिता सीरीज, भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टि में, साहित्य भवन पब्लिशर्स एण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, आगरा, २००६. पृ. 20
28 पुरूशोत्तम लांडगे, डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२. पृ.५५
29 तत्रैव पृ. ५७
30 रूद्र दत्त, के.पी.एस.सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था, एस.चंद आणि कंपनी प्रकाशन, रामनगर, दिल्ली. 2006 पृ. २५२
31 पुरूशोत्तम लांडगे, डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२. पृ.66

32 डॉ. आर. वाय. माहोरे, जागतिक व्यापार संघटना आणि सेवांच्या व्यापारासबंधी सामान्य करार.(शोधनिबंध) नागपूर विद्यापीठ, नागपूर.
33 तत्रैव
34 पुरूशोत्तम लांडगे, डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२. पृ. 72
35 ॲडमिरल विष्णू भागवत, जागतिकीकरण नविन गुलामगिरी, समता प्रकाशन, नागपूर २००६. पृ. ७८
36 तत्रैव पृ. ८१
37 पुरूशोत्तम लांडगे, डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२. पृ. ९४

3

# डॉ.आंबेडकरांचा आर्थिक दृष्टिकोन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे भारतमातेचे एक महान सुपुत्र. भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून ते सर्वज्ञात आहेत. कायदेशास्त्रज्ञ, समाजशास्त्र, राज्यशास्त्र ते मानववंशशास्त्र आणि तुलनात्मक धर्मशास्त्र अशा भिन्न भिन्न ज्ञान शाखांमध्ये भराऱ्या घेऊन त्यांनी त्यामध्ये मोलाची भर घातली आणि त्याला विद्वतमान्यताही मिळाली.[1] एक महान समाजसुधारक, मानवी हक्काचे कैवारी, पददलितांचे उद्धारकर्ते, शिक्षणतज्ञ, सांसद आणि पत्रकार म्हणूनही त्यांना सर्व जगात मान्यता मिळाली. त्यांच्या बहुविध व्यक्तिमत्त्वाचे महत्त्वाचे अंग म्हणजे अर्थतज्ञ म्हणून बजावलेली विलक्षण कामगिरी.

डॉ. आंबेडकर अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. त्यांनी आर्थिक विषयावरील शेकडो ग्रंथांचा अभ्यास केला होता. डॉ. आंबेडकर खरोखर अर्थशास्त्राचे विद्यार्थी होते. अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातून एम.ए. 1915 साली आणि 1917 साली पीएच.डी. ह्या पदव्या अर्थशास्त्र विषयातून घेतल्या. 1921 साली 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या विख्यात शिक्षण संस्थेतून 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी अर्थशास्त्रातील 'Problem of Rupee' या संशोधनपर ग्रंथाबद्दल मिळाली. मुंबई येथील 'सिडनहॅम' कॉलेजमध्ये 1918 ते 1920 या दरम्यान ते अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते.[2] जागतिक स्तरावरील अर्थशास्त्राचे प्रोफेसर सेलीग्मन आणि कॅनन यांच्याशी त्यांनी अर्थशास्त्रावर अनेकदा चर्चा केली.

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात शासनाला वेळोवेळी सादर केलेल्या निवेदनातून तसेच अनेक आयोगापुढे त्यांनी दिलेल्या साक्षीतून भारतीय अर्थकारणाच्या समस्याबाबतचा त्यांचा अभ्यास व ज्ञानाची कल्पना येते. त्यांची भाषणे आर्थिक विचारांनी ओतप्रोत भरलेली आहेत. अस्पृश्यता आणि जातीव्यवस्थेच्या आर्थिक पैलूवर भर टाकणारे ते देशातील पहिले अभ्यासक होते. भारतीय राज्यघटनेत आर्थिक आणि वित्तीय तरतुदींचा अंतर्भाव करण्याचे

श्रेयही त्यांनाच जाते. डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांना वैश्विक महत्त्व आहे.

डॉ. आंबेडकरांनी हिंदु समाजव्यवस्थेच्या विषमतेवर मात करण्यासाठी व सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने व त्याद्वारे देशाचा आर्थिक विकास कसा होईल यावर चिंतन करून आपला आर्थिक कार्यक्रम राज्य समाजवादाच्या रूपाने या देशाला दिला होता. डॉ. आंबेडकरांनी ग्रामीण जीवनाचे उदात्तीकरण केले नाही आणि आधुनिक उद्योगाचे महत्त्व ते मान्य करीत. बुद्धाची स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तत्वे लक्षात घेऊन डॉ. आंबेडकरांनी आपले तत्त्वज्ञान मांडले ते समाजात आर्थिक आणि सामजिक समता प्रस्थापित व्हावी म्हणून.

डॉ. आंबेडकरांच्या मिश्र अर्थव्यवस्थेचे तत्व मान्य करून भारताने 1990 पर्यंत सार्वजनिक क्षेत्राच्या माध्यमातून भरपूर प्रगती साधली होती. परंतु देशातील भ्रष्ट नोकरशाहीने भारतावर अनेक नवीन आर्थिक संकट निर्माण केलेत. देश आर्थिक प्रगतीच्या विवंचनेत असतानाच भारताने मिश्र अर्थव्यवस्थेऐवजी मुक्त आर्थिक धोरणांचा अवलंब करायला सुरूवात केली.

सर्वप्रथम राजीव गांधी सरकारने 1985 साली शिथिलीकरणाच्या दिशेने पहिले पाऊल उचलले. यामुळे करार कामगार पद्धती, कारखाने बंदी, खाजगीकरण व नोकर कपात यासारख्या गोष्टी सुरू झाल्यात. त्यानंतर 1991 मध्ये नरसिंहराव सरकारने नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्याचे अधिकृतपणे जाहीर केले. भारतामध्ये 1991 ते 2008 अशी 17 वर्षे चर्चा सुरू आहे. त्याचबरोबर त्याची अंमलबजावणी ही चालू आहे. ‘देशाची आर्थिक स्थिती’ अतिशय गंभीर आहे. ती सुधारण्यासाठी विदेशी चलनाची गरज आहे. विदेशी चलन मिळविण्यासाठी जगाच्या बाजारात ‘स्पर्धेत’ उतरले पाहिजे आणि जास्तीत जास्त निर्यात करून विदेशी विनिमय मिळवायचे यासाठी उद्योगपतींना उत्पादन करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून सवलती व त्याचा परिणाम म्हणून एक्झिट पॉलिसी, ओपन डोअर पॉलिसी, रिट्रेंचमेंट, सुवर्ण हस्तांदोलन या सर्व गोष्टींच्या

अंमलबजावणीसाठी कायद्यात बदल करणे. या सर्व गोष्टी मुक्त आर्थिक धोरणाच्या संबंधाने आलेल्या आहेत.[3]

या सर्व गोष्टींचा एकंदरीत परिणाम हा बहुजन समाजावर पडलेला आहे. बहुजन समाजातील श्रमिक, शेतकरी, लघु उद्योजकांवर आज बेरोजगारीची टांगती तलवार आहे.

विश्व व्यापार संघटनेच्या निर्मितीमुळे आणि त्यानंतर केलेल्या कराराचे आज अनिष्ट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर आणि संबंधित जाती घटकांवर पडू लागला आहे. मुक्त धोरणामुळे बेकारी, गरीबी, महागाई यासारख्या गंभीर समस्यांना बहुजन समाजाला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे भारतात आज जागतिकीकरण आणि जमातवाद हे दोन भयंकर प्रश्न निर्माण झालेले आहे.

26 जानेवारी 1950 सालापासून संसदीय लोकशाही भारताने स्वीकारली. जगामध्ये सर्वोत्कृष्ट अशाप्रकारे नावाजलेली 'भारतीय राज्यघटना' आहे. त्यात लोकशाहीच्या माध्यमातून मनुष्य हा 'केंद्रबिंदू' व 'एक व्यक्ती एक मत' हे तत्व स्वीकारून भारताने मानाचे स्थान मिळविले आहे.[4] याच राज्यघटनेत 'मिश्र अर्थव्यवस्थेचा' पुरस्कार करण्यात आलेला होता. त्यानुसार सरकारची तसेच काही क्षेत्रात खाजगी मालकीचे तत्व स्वीकारण्यात आले होते. आज घटनेची पायमल्ली करून 'मुक्त अर्थव्यवस्थेचा' स्वीकार करण्यात आला आहे. त्यामुळे भारतातील बहुजन समाजावर त्याचा विपरित परिणाम पडलेला आढळून येतो.

## अ) मुक्त आर्थिक धोरणाचा मागासवर्गीय समाजावर पडणारा प्रभाव :

भारतात 1950 पासून सुरू झालेले आर्थिक धोरण मुक्त अर्थव्यवस्थेच्या रूपाने 1990 मध्ये बदलले आहे. या बदललेल्या अर्थव्यवस्थेने भारतीय समाजावर अनेक विघातक परिणाम मुक्त आर्थिक धोरणामुळे समाजातील विषमतेला आणखीनच खतपाणी मिळाले आहे. मुक्त आर्थिक धोरणाचा अवलंब केल्यामुळे देशातील फक्त 15% उच्चभ्रूचे चेहरे व पेहराव बदललेला आहे परंतु मागासवर्गीयांच्या जीवनात कोणतेही परिवर्तन घडून आले नाही उलट

त्यांच्या विकासाचे अनेक मार्ग हिरावून घेण्यात आले आहेत. म्हणजेच या मुक्त धोरणापासून मागसवर्गीयांना फायदा कमी व तोटा जास्त होत आहे.

मागासवर्गीय समाज म्हणजे ''अनुसूचित जाती व जमाती, भटक्या विमुक्त जाती व जमाती, आदिवासी, इतर मागासवर्गीय असा 85% भारतीय लोकसमूह होय.'' हा समाज देशाचे पालनपोषण आणि संरक्षण व असीम त्याग प्राचीन काळापासून करीत आला आहे.[5]

भारतात मागासवर्गीयांचे वर्गीकरण केल्यास ते -

| | | |
|---|---|---|
| अनुसूचित जाती | - | 15 % |
| भटके विमुक्त, आदिवासी | - | 7½ % |
| अल्पसंख्याक | - | 10 ते 12 % |
| इतर मागास जाती | - | 52 % प्रमाणे आहेत. |

मुक्त आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे आज मागासवर्गीय समाजात विविध समस्या निर्माण झाल्या आहेत - त्यात 1. महागाई 2. बेरोजगार 3. दारिद्र्य 4. शिक्षण 5. गरीबी 6. शेती 7. अनुदान 8. मानवी विकास 9. संस्कृती 10. पर्यावरण ह्या मुख्य समस्या आहेत.

मुक्त आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर देशातील मागासवर्गीयांची स्थिती पुढीलप्रमाणे झालेली आहे -

1) बेकारी, बेरोजगारी, महागाई, दारिद्र्य निर्माण झाल्यामुळे गुंडगिरीमध्ये प्रचंड वाढ झाली आहे.

2) आज फक्त उत्तरप्रदेश आणि बिहारच नव्हे तर देशाच्या प्रत्येक भागात गुंडागर्दी व दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

3) दिवसेंदिवस सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत आहे.

4) मुक्त धोरणातील माहिती तंत्रज्ञानाचा परिणाम सामाजिक जीवनावर नकारात्मक होत आहे. कारण समाजात अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्याचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा धारण करीत आहे.

5) मुक्त आर्थिक धोरणामुळे सामाजिक सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

6) आज पुढाऱ्यांनाही पोलीस ताफ्यासह फिरावे लागत आहेत. मागासवर्गीय समाज असुरक्षित झालेला आहे.

7) जाती व धर्माच्या नावावर वेळोवेळी संघर्ष निर्माण होत आहेत. त्याचा फायदा प्रस्थापित राजकीय मंडळींना होत आहे.

8) उच्चनीच भेदभावाची दरी वाढत आहे.[6]

9) आरक्षण %

आरक्षणाने मागासवर्गीयांच्या जीवनात आशावाद निर्माण झाला. त्यांनी साधलेली शैक्षणिक प्रगती, या आशावादाचाच परिणाम आहे. आजची खाजगीकरणाची स्थिती पाहता आरक्षण संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे.

10) राखीव जागाच्या आधारे प्रगती साधणारा मागासवर्गीय मुक्त धोरणाचा या प्रयोगात नामशेष होण्याच्या मार्गात आहे.

11) सरकारी अनुदान कपात झाल्यामुळे मागासवर्गीयांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात नकारात्मक प्रभाव पडलेला आहे.

12) सरकारच्या माध्यमातून शिक्षणाच्या सोयी सुविधा भटक्या विमुक्तापर्यंत आणि इतर मागासवर्गीयापर्यंत पोहचण्यापूर्वीच शिक्षणाचे खाजगीकरण होत असल्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगती थांबली आहे.

13) उद्योगपतींना कोणत्याही विभागात उद्योग करण्यास कोणतेही बंधन नसल्यामुळे आदिवासी आणि मागासवर्गीयांच्या जमिनी हडप केल्या जात आहेत.

14) राज्य घटनेचा हस्तक्षेप कमी होत असल्यामुळे राज्य घटनेच्या माध्यमातून मिळणाऱ्या सोयी सुविधा आपोआपच बंद होण्याच्या मार्गावर आहेत.

15) मागासवर्गीयांकरिता असलेले लघु व कुटीर उद्योग सरकारी अनुदानाअभावी बंद पडत आहेत.

मुक्त आर्थिक धोरणाचे मागासवर्गीय समाजावर पडणाऱ्या प्रभावावर अनेक लेखकांनी आणि विचारवंतांनी आपली मते दिलेली आहेत ती खालीलप्रमाणे आहेत -

**1) विलास दासगुप्ता (प्राध्यापक, कलकत्ता विद्यापीठ) %**

''नवीन आर्थिक धोरणापासून अपेक्षित असलेले फायदे पंधरा कोटी दलितांपर्यंत पोहचले नाहीत. प्रशासनाने मंजूर केलेला निधी दलितासारख्या वंचित घटकापर्यंत पोहचल्याचा सबळ पुरावा अद्याप हाती आलेला नाही.''

**2) डॉ. आनंद तेलतुंबडे %**

''अद्याप 75% हून अधिक दलित शेतीशी निगडित आहेत. यातील 25% अल्प व अत्यल्प भूधारक गटात मोडतात. उरलेले 50% दलित भूमीहिन शेत मजूर आहेत.''

**3) डॉ. भालचंद्र मुणगेकर (सदस्य, योजना आयोग) %**

''दलित, उपेक्षित घटकांच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांना मिळणाऱ्या नोकऱ्यांतील राखीव जागा या फक्त सार्वजनिक, अन्य शासकीय उद्योग आणि उपक्रमापुरत्याच मर्यादित असल्यामुळे नवीन आर्थिक धोरणाचा थेट दुष्परिणाम राखीव जागा कमी होण्यात होणार आहे.''

**4) प्रा. नानचेडिया %**

''दलितांच्या आर्थिक जीवनावर परिणाम करणारी तीन क्षेत्र अतिशय महत्त्वाची आहेत ती म्हणजे 1. कामगार क्षेत्र 2. उत्पादन क्षेत्र 3 ग्रामीण क्षेत्र. या तीनही क्षेत्रात दलित अपंग आहेत. त्यांचे काहीही प्रभुत्व नाही. ते पुढे म्हणतात की, हरित क्रांतीमुळे उत्पादन खूप वाढले परंतु मजुरांचे वेतन वाढले नाही तसेच कमकुवतपणा आणि सामाजिक विषमता यामुळे दलितांबाबत भेदभाव केला जातो आणि हे विशेषत% ग्रामीण क्षेत्रात जास्त घडते.''[7]

**5) प्रा. जैमिनी कडू %**

''सेझमुळे गरीबी, बेरोजगारी, महागाई, रोगराई, उपासमार यांनी देश होरपळून निघालेला आहे आणि त्यात मरणारा वर्ग कुणबी बहुजन हा
आहे.''[8]

मुक्त आर्थिक धोरणाचा अंमलबजावणीमुळे मागासवर्गीयांवर अतिशय प्रतिकूल परिणाम पडला असून हा समाज पुन्हा दारिद्र्यांमध्ये ढकलल्या जात आहे. मागासवर्गीयांच्या उन्नतीचे प्रत्येक

क्षेत्र आज बंद होत आहे. त्या प्रत्येक क्षेत्रानुसार विश्लेषण खालील प्रमाणे-

## १) महागाई

सन 1991 नंतर भारतात सर्वच जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती झपाट्याने वाढत आहेत. या महागाईचा प्रत्यक्ष परिणाम मागासवर्गीयांवर पडलेला आहे. भारत सरकारने केलेल्या अवमूल्यनामुळे या भाववाढीस भरपूर वाव मिळत आहे. वाढत चाललेल्या महागाईमुळे मागासवर्गीय समाजाला त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्यापासून वंचित राहावे लागत आहे.

## २) कृषी

या देशाचा अन्नदाता म्हणून मागासवर्गीय समाजाला मान्यता आहे. मागासवर्गीय लोक मोठ्या प्रमाणात शेती क्षेत्राशी जुळलेले आहेत. मुक्त आर्थिक धोरणामुळे शेतमालाच्या उत्पादनासाठी केलेला किमान खर्च भागवू शकेल एवढी देखील किंमत त्यांच्या शेतमालाच्या विक्रीतून होत नसल्यामुळे तो फार खचला आहे. तो कर्जबाजारी झाला आहे. मागासवर्गीय समाज मुळात अल्पभूधारक शेतकरी असल्यामुळे व्यापारी आणि यंत्राने शेती करणे त्यांच्या आवाक्याबाहेरचे झाले आहे. आज भारतीय शेती पूर्णपणे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वर्चस्वाखाली जाऊ पाहत आहे. खते, बी-बियाणे यावरील सबसिडी कमी केली जात आहे. या वस्तुंचे भाव देखील वाढलेत.

शेतीशी निगडित असलेला दुग्ध व्यवसाय मुक्त धोरणाच्या आवाक्यात आलेला आहे. त्यामुळे भारतात आता युरोपियन देशातील दूध येणे सुरू झाले आहे.[9] मोठमोठ्या कंपन्या भारतीय शेती विकत घेऊन त्यात मोठ्या प्रमाणात शेतीचा व्यवसाय करण्याचा बेत आखत आहेत. जर का एकदा बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात शेती करणे सुरू केले तर आज जो मागासवर्गीय समाज अल्पभूधारक आणि मालक म्हणून वावरत आहे. उद्या त्यालाच त्याच्याच शेतात मजूर म्हणून राबावे लागणार आहे.

## ३) रोजगार

भारतात बेरोजगारीची समस्या जुनी असली तरी मिश्र अर्थव्यवस्थेने त्यावर योग्य प्रमाणात सुधारणा केलेली होती. विविध कंपन्यांमध्ये मागासवर्गीय समाजाला काम मिळत असे. परंतु मुक्त धोरणात मात्र खाजगीकरण, कामगार कपात, स्वेच्छा निवृत्ती, एक्झीट पॉलिसी, स्पर्धात्मक धोरण, गुणवत्ता आणि कौशल्य या सर्वांचा समावेश झाल्याने बेरोजगारीत वाढ होत आहे.[10] त्याचा एकंदर परिणाम मागासवर्गीय समाजावर पडून काम नसल्याने तो अनैतिक मार्गाकडे ओढावत चालला आहे. भारतातील 15 कोटी 52 लाख मागासवर्गीय हे सुशिक्षित बेकार आहेत आणि नोकरी कपात मात्र सुरूच आहे. मागासवर्गीयांनाच अतिरिक्त कामगार म्हणून नोकरीवरून काढण्यात येत आहे.

## ४) शिक्षण

मुक्त धोरणात शिक्षणाच्या खाजगीकरणाला मोठ्या प्रमाणात चालना देण्यात आली आहे. शिक्षणाचे बाबतीत पहिले सूत्र सरकारने स्वीकारले आहे की ''शाळा चालविणे सरकारचे काम नाही.'' ज्यांच्याकडे पैसा आहे त्यांनीच शाळा चालवाव्यात. सरकार अनुदान देणार नाही. शाळा उघडण्यासाठी परवानगीची गरज नाही. फी सुद्धा संस्थांनीच ठरवावी.

राज्यात एकूण 130 खाजगी अनुदानित महाविद्यालये आहेत. त्यापैकी 100 राजकारणी मंडळाची, 19 उद्योगपतींची व बाकी गावगाड्यातील वजनदार मंडळींची आहेत. 1983 ते 2000 या कालावधीत खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयाची खिरापत वाटण्याचे काम केले गेले.

14 ऑगस्ट 2005 ला सर्वोच्च न्यायालयाने वैद्यकीय व अभियांत्रिकी व्यवसायिक महाविद्यालयांना आरक्षण व सरकारी कोटा लागू होणार नाही असा अन्यायपूर्वक निर्णय दिला आहे.

भारतात निरक्षरांची संख्या वाढतच आहे असे एकंदर निदर्शनास येते. या सर्व निरक्षरांमध्ये 100% हे मागासवर्गीय आहेत हे खेदाची बाब आहे. सन 2001 साली 35 कोटी मागासवर्गीय निरक्षर होते त्यात 15 कोटी लोकांना फक्त नाव लिहिता येते.[11]

देशातील मागासवर्गीयांची शैक्षणिक प्रगती मोठ्या प्रमाणात खुंटत चालली आहे. प्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षण महाग होत चालले आहे. मुक्त धोरणातून मागासवर्गीयांना शिक्षणापासून वंचित करून पुन्हा त्यांना गुलाम बनविण्याचे षडयंत्र देशातील 15% उच्चवर्णीय लोकांनी रचले आहेत.

### ५) गरीबी

मुक्त आर्थिक धोरणाचा एकंदर लाभ देशातील उच्चवर्णीय लोकांना मिळतो. मागासवर्गीय लोकांच्या वाट्याला फक्त गरीबी तेवढी शिल्लक राहणार आहे. सरकारने दारिद्रय निर्मूलन कार्यक्रमात कपात करून गरीबी वाढविण्याच्या धोरणाला पाठबळ मिळाले आहे. सध्या देशात 5 वर्षाखालील 4.5% बालके कुपोषणाने ग्रस्त आहेत आणि गरिबीचा दर 26% एवढा आहे. यात मागासवर्गीयांचा समावेश मोठ्या प्रमाणात असल्याने ही चिंतेची बाब आहे.

### ६) आरोग्य

गेल्या पन्नास वर्षात पिण्याच्या पाणी पुरवण्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च झाले तरी एकात्मिक पाणी धोरण नसल्याने पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. सध्या आरोग्य सेवेचे खच्चीकरण तीन मार्गातून सुरू आहे. 1) नवीन भरतीवर बंदी 2) मोफत औषध पुरवठा बंद 3) आरोग्य साधनांचा तुटवडा.[12]

देशात सध्या सहा लाख गावांमध्ये पाणी नाही. त्यामुळे दरवर्षी दहा लाख बालके दगावत आहेत. पाच लाख लोक क्षयरोगाने दरवर्षी दगावत आहेत. जगातील 94% कुष्ठरोगी एकट्या भारतात आहेत. शंभर कोटीच्या देशात फक्त दहा कोटी लोकांकडेच शौचालयाची सुविधा आहे. दरवर्षी 12 लाख महिला बाळंतपणाच्या काळात मरत आहेत. 80% भारतीय महिलांच्या रक्तात हिमोग्लोबीन कमी आहे. अशी एकंदर भारतातील मागासवर्गीय लोकांच्या आरोग्याची अवस्था झालेली आहे.[13]

खाजगीकरणात आरोग्य सुविधा दिवसेंदिवस महाग होत आहेत त्यामुळे भविष्यात चांगले आरोग्य मागासवर्गीयांकरिता अशक्य बाब होणार आहे.

## ७) अनुदान

मागासवर्गीयांना त्यांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीकरिता मिळणारे सरकारी अनुदान दरवर्षी कमी होत चालले आहे. शिक्षण, आरोग्य मुलभूत सोयीकरिता मिळणारे अनुदान कमी होत आहे. कृषी क्षेत्राच्या विकासाकरिता सरकारने अनुदान देणे बंद केलेले आहे. याचा एकंदर परिणाम हा मागासवर्गीयांना मुख्य प्रवाहातून हाकलून लावून त्यांना आणखी दरिद्री आणि मागास करण्याचा आहे.

## ८) मानवी विकास

मानवी विकासाची बाब लक्षात ठेवून भारतीय संविधानाने समाजातील मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची तरतूद केली आहे. आज मुक्त धोरणाचा माध्यमातून विविध समूहाचे आरक्षण समाप्त होत चालले आहे. याचा एकंदर परिणाम मागासवर्गीयांच्या जीवनावर होणार आहे. आरक्षणाच्या माध्यमातून मिळणारे शिक्षण आणि नोकरी समाप्त करण्यात येत आहे.

## ९) पर्यावरण

मुक्त आर्थिक धोरणातून देशात होणाऱ्या बदलाचा परिणाम हा पर्यावरणावरही झालेला आहे. भारताच्या पर्यावरणाचे रक्षण येथील मागासवर्गीयांनी वेगवेगळे आंदोलन करून केलेले आहे. याचे इतिहासात अनेक उदाहरणे आहेत. मुख्यत% जंगलात राहणारा आदिवासी समाजाने जंगलाचे रक्षणच केलेले आहे.

मुक्त धोरणातून येणाऱ्या कंपन्या विविध मार्गाने पर्यावरणाला धोका निर्माण करत आहेत. मोटारीची किंमत कमी झाल्यामुळे त्यांच्या खप वाढला. त्यामुळे ध्वनी व वायू प्रदूषणाची समस्या निर्माण झाली. कारखान्यातून निघणारे धूर, जंगलाची कटाई यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे. आज जो ‘ग्लोबल वार्मिग’ चा मुद्दा जगासमोर उभा आहे त्याचे मूळ कारण म्हणजे वाढते औद्योगिकरण होय.

‘ग्रीनीपिक्स इंटरनॅशनल’ नुसार तामीलनाडुच्या फ्युचुरा इंडस्ट्रीजने 1992 पासून आपल्या देशात 10 हजार टन धात्विक, प्लॉस्टीक कचरा आणला आहे. ऑस्ट्रेलियातूनही 1994 मध्ये 50

लाख किलो कचरा भारतात आला. पेप्सी पासून रोगांना नियंत्रण देण्यात आले तसेच पाण्याची पातळीही कमी करण्यात आली. त्यामुळे पर्यावरण हा मागासवर्गीय जनतेचा मुलभूत हक्क नष्ट केला गेला.[14]

## १०) भ्रष्टाचार

मुक्त धोरणाच्या माध्यमातून सत्ताधारी वर्ग मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करून येथील साधन संपत्तीवर स्वत%चे वर्चस्व कायम करीत आहे.

1) हर्षद मेहता ने हजारो कोटी रुपयांचा घोटाळा केला.
2) भन्साळीने कोट्यावधी रुपयेचा घोटाळा केला.
3) सुखरामाच्या घरात कोट्यावधी रुपये सापडले.
4) जयललिता यांच्यावर भ्रष्टाचाराच्या अनेक केसेस आहेत.
5) केतन पारेख घोटाळा
6) युनिट ट्रस्ट घोटाळा
7) पी.व्ही. नरसिंहराव यांचा भ्रष्टाचार
8) सहकारी संस्थातील घोटाळे
9) नोकरशाहीचा प्रचंड भ्रष्टाचार[15]

या सर्व भ्रष्टाचारातून मागासवर्गीय लोकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. युनिट ट्रस्ट घोटाळ्याने तर मागासवर्गीय लोकांचे प्रचंड प्रमाणात आर्थिक नुकसान झाले.

मुक्त धोरणाच्या माध्यमातून भारतात काळ्या पैशाची एक समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे.

## ११) चंगळवाद

मुक्त आर्थिक धोरणाच्या माध्यमातून प्रसार माध्यमावरील निर्बंध कमी होत आहेत. काही काळानंतर ते सर्वस्वी मुक्त ही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज टि.व्ही., रेडिओ, सीडी, वृत्त वाहिन्याचे चॅनल्स यांचे माध्यमातून 24 तास हसणे, खिदळणे, नाचणे, गाणे, चमचमीत पदार्थ बनवून खाणे यासारखे कार्यक्रम दाखविले जातात. या देशात 26 कोटी लोकांना अर्धपोटी अन्नही मिळत नसतांना त्यावर साधी चर्चा देखील होत नाही. मागासवर्गीय समाजाला शॉटकर्ट पैसा कमविण्याचे विविध कार्यक्रम ही दाखविले जातात तसेच अश्लीलता पसरविणारे कार्यक्रम भरदिवसा

दाखविण्यात येतात. त्यातून मागासवर्गीयांना नितीहीन करण्याचे धोरण प्रस्थापित वर्ग करीत आहे.[16]

या मुक्त आर्थिक धोरणातून येणारे खाजगीकरण आणि जागतिकीकरणात मागासवर्गीय समाजाची दमछाक होणार आहे. भारत एकेकाळी हत्तीवर बसून लढायचा तेव्हा शत्रू घोड्यावरून आला. भाला टोचून त्यांनी हत्तीवरून पाडले. भारतीय मागास समाज जेव्हा घोड्यावर बसला तेव्हा शत्रू विमानातून आला. भारतीय माणूस विमान शिकला तेव्हा शत्रू क्षेपणास्त्र चालवू लागला. अशाप्रकारे मागासवर्गीय नेहमीच शत्रूला हरलेला आहे. शत्रू नेहमीच नवीन साधनांचा उपयोग करतो पण मागासवर्गीय समाज जुन्यालाच सोन समजून बसला आहे. जागतिकीकरणाला समोरे जाण्याचा मागासवर्गीयांसमोर फक्त एकच मार्ग उरलेला आहे. तो म्हणजे संघटित होऊन डॉ. आंबेडकर प्रणीत राज्य समाजवाद प्रस्थापित करणे होय.

## ब) डॉ. आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून मुक्त आर्थिक धोरणाचे विश्लेषण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्थशास्त्राचे विद्यार्थी म्हणून जगले व वावरले. डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्र विषयात उच्च पदव्या घेतल्या तसेच त्यांचे अनेक शोधप्रबंध सुद्धा अर्थशास्त्र विषयावरच आहेत. अर्थशास्त्रावर डॉ. आंबेडकरांनी तीन विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिलेत. त्यात 1) ईस्ट इंडिया कंपनी % प्रशासन आणि अर्थनिती 2) ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती 3) रुपयाचा प्रश्न उद्गम आणि उपाय. पहिल्या दोन पुस्तकात डॉ. आंबेडकरांनी सार्वजनिक वित्त या अर्थशास्त्राच्या पोटशाखेत भर घातली आहे. तिसरे पुस्तक मौद्रिक अर्थशास्त्रात भर टाकणारे आहे.

जागतिक दर्जाच्या अर्थतज्ञांवर नजर टाकल्यास एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, प्रत्येक तज्ञाने स्वत%चे सिद्धांत तयार केलेले आहेत -

1) कार्ल मार्क्स - श्रम मूल्याचा आर्थिक सिद्धांत

2) ॲडम स्मिथ - मुक्त अर्थव्यवस्था

3) प्रा. केन्स - अर्थव्यवस्थेत सरकारचा हस्तक्षेप
4) डॉ. बी.आर. आंबेडकर - राज्य समाजवाद[17]

डॉ. आंबेडकरांचे आर्थिक तत्त्वज्ञान सर्वसमावेशक स्वरूपाचे आहेत. डॉ. आंबेडकरांच्या चिंतनात स्वार्थाला कोणतेही स्थान नव्हते. दुर्बल वर्गाची गरीबी दूर करणे हे त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट होते. डॉ. आंबेडकरांनी स्वाभिमानपूर्वक म्हटले होते की, ''मी केवळ अनुसूचित जातीच्या लोकांमध्येच नव्हे तर संपूर्ण भारतात पहिला व्यक्ती आहे. जो परदेशात जाऊन अर्थशास्त्रातील पदवी घेऊन मायदेशी परतलो आहे.''[18]

मुक्त आर्थिक धोरणाची अंमलबजावणी सन 1991 पासून झाली. त्यापूर्वी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार भारताने डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक तत्त्वज्ञानातून केलेला होता. डॉ. आंबेडकरांनी मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारताना विविध आर्थिक विषयांवर प्रकाश टाकला आहेत. आज भारताने जरी मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला तरी ते बहुसंख्य समाजात विषमता निर्माण करणारे असेच आहे. आज थोड्या लोकांच्या हातात अर्थव्यवस्था एकवटलेली आहे. त्यामुळे सर्वांचे कल्याण साधण्यात बाधा निर्माण झाली आहे. मुक्त धोरणात डॉ. आंबेडकरांचे विचार कल्याण साधण्याच्या बाबतीत फार उपयुक्त असेच आहेत.

## १) शेती

डॉ. आंबेडकरांचे शेती विषयक चिंतन ''भारतातील लहान धारण क्षेत्र आणि त्यावरील उपाय'' या लेखातून आढळून येते. डॉ. आंबेडकरांनी शेतीशी निगडित असलेले प्रश्न सोडविण्यासाठी शेतीचे राष्ट्रीयीकरण करावे यावर भर दिला. शेतीचे राष्ट्रीयीकरणातून आर्थिक गुलामगिरी नष्ट होऊन आर्थिकदृष्टया कल्याणकारी राज्य निर्मितीस मदत होईल. सामुदायिक शेतीचा प्रयोग प्रत्यक्षात आणला तर त्यामुळे शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढण्यास मदत होईल. त्यातून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावून त्यांना आर्थिक सुदृढता प्राप्त होईल.[19]

शेतीचे औद्योगिकरण केल्याशिवाय भूमीहिन शेतमजुरांचा प्रश्न मूलत% सुटणार नाही. शेतीपासून उद्योगधंद्याची फारकत होणे हे अर्थव्यवस्थेला धोकादायक असते असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

डॉ. आंबेडकरांनी राज्य समाजवादातून भारतीय शेतीचा प्रश्न सोडविला आहे त्यात ते म्हणतात की -

1) शेती हा राज्याचा उद्योग असावा.

अ) शासन जमिनीचे योग्य भाग करून ते कसायला देईल.

ब) शासकीय नियमानुसार शेती केली जावी.

क) शेती उत्पादकांनी ठविलेल्या पद्धतीप्रमाणे कसणाऱ्या प्रत्येकास शेतीच्यामालात सवलतीचे पैसे देऊन सहभागी होता येईल.

2) खेड्यातील लोकांना शेती देताना कोणताही भेदभाव करण्यात येणार नाही.

3) सामूहिक शेतीकरिता भांडवल, पाणी, जनावरे, बियाणे शासनाने उपलब्ध करून द्यावे.

4) राज्य शेतीला काही सवलती देऊ शकतो -

अ) शेतसाऱ्याचा काही भाग

ब) कर्जधारकाला द्यावयाचा काही भाग

क) साधनांसाठी दिलेल्या पैशाचा काही भाग

5) शेती कसणाऱ्याने नियमांचा भंग केला किंवा सामूहिक शेतीला बाधक असे आचरण केले तर त्याला कोणता दंड द्यावा हे शासनाने ठरवावे.[20]

डॉ. आंबेडकरांच्या शेती विषयी विचारात त्यांचा सखोलपणा जाणवतो. डॉ. आंबेडकरांचा अभ्यास सूक्ष्म आणि वैज्ञानिक असा होता. राज्य समाजवादातून डॉ. आंबेडकरांनी संपूर्ण समाजाचे हित बाळगले आहे.

मुक्त धोरणात शेतीला कोणतीही मदत शासन करू इच्छित नाही. शेतकऱ्यांपासून शेती हिसकावून घेणे असाच शासनाचा बेत आहे. परंतु डॉ. आंबेडकरांचे शेती विषयी विचार हे देशातील शेती करणाऱ्या 70% लोकांना फायद्याचे आहेत. कारण ते मुक्त धोरणाच्या अगदी विरूद्ध असेच आहेत.डॉ. आंबेडकरांनी राष्ट्रीयीकरण करण्यावर भर दिला. कारण शेतीचे राष्ट्रीयीकरण

झाल्यास शेतीचा योग्यप्रकारे विकास करता येईल. त्यामुळे देश 'सुजलाम सुफलाम' होऊ शकतो.

## २) सार्वजनिक उद्योग %

डॉ. आंबेडकरांनी 'राज्य समाजवादात' सार्वजनिक उद्योगाचा सुद्धा विचार केला आहे. त्यात डॉ. आंबेडकर काही उपाय सुचवितात -

1) जे प्रमुख उद्योग आहेत आणि ज्यांना प्रमुख उद्योग म्हणून राज्याने जाहीर केले आहेत असे उद्योग राज्याच्या मालकीचे असावेत व ते राज्याने चालवावेत.

2) जे प्रमुख उद्योग नाहीत पण पायाभूत उद्योग आहेत ते राज्याच्या मालकीचे व राज्याने स्थापित महामंडळाने चालवावेत.

डॉ. आंबेडकरांनी 'मिश्र अर्थव्यवस्थेचा' स्वीकार केलेला आहे. काही सार्वजनिक मालकीचे व काही खाजगी मालकीचे उद्योग असायला पाहिजेत ही त्यांची भूमिका होती.[21]

याच तत्वांचा अवलंब भारताने करून मोठ्या प्रमाणात सार्वजनिक उपक्रम सुरू केले होते. परंतु मुक्त धोरणाचा स्वीकार देशाने करून सार्वजनिक क्षेत्राचे मोठ्या प्रमाणात खाजगीकरण करण्यात आले. मातीमोल किंमतीला सार्वजनिक क्षेत्र विकून सरकारने कनिष्ठ व गरीब वर्गाला दडपले आणि उच्चवर्गीयांची सत्ता प्रस्थापित केली.

समाजात सार्वजनिक उपक्रम असल्याने राष्ट्रीय संपत्ती वाढते. लोकांना रोजगार मिळतो. परंतु खाजगीकरणात केवळ बेकारी वाढण्याचेच धोरण सुरू आहेत त्यामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारी निर्माण झाली आहे.

## ३) कामगार

डॉ.आंबेडकरांनी मानवतावादी दृष्टिकोनातून कामगारांच्या हिताकरिता काही योजना कार्यान्वित करण्याचा प्रयत्न केला. त्यात -

1) कामगारांच्या उपस्थितीत सुधारणा करणे.
2) औद्योगिक संबंधात सुधारणा करणे.
3) कामगारांच्या राहणीमानात वाढ करणे.
4) कामगारांच्या कार्यक्षमतेत सुधारणा करणे.

5) कामगारांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे.[22]

डॉ.आंबेडकरांनी सांगितलेल्या वरील सर्व बाबी श्रमिक कल्याणाच्या आहेत.

डॉ. आंबेडकरांनी श्रमिक कल्याणाचे तत्त्वज्ञान मांडतांना ‘स्वतंत्र मजूर पक्षाच्या’ जाहिरनाम्यात आर्थिक धोरणाचा समावेश केला होता. त्यात -

1) शेतीच्या प्रगतीसाठी पतपेढ्या सुरू करणे.
2) शेतीच्या कच्च्या मालाच्या अनुरोधाने उद्योग निर्माण करणे.
3) धंदे शिक्षणाची सुरुवात करणे.
4) उद्योगाची मालकी सरकारकडे द्यावी.
5) कारखान्यातील कामगारांच्या हिताकरिता नोकरी, बढती, पगारवाढ, सरकारी नियंत्रण, कामाचे प्रमाणित तास, पगारी रजा, बोनस, पेंशन, विमा आणि निवासांच्या सोयी निर्माण करणे.
6) बेकारी कमी करण्याकरिता सरकारवर दबाव आणणे.

वरीलप्रमाणे जाहिरनाम्यात श्रमिक संरक्षणाची धोरणे अंतर्भूत होती.[23]

डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत मानवी हक्क, कर्तव्ये, स्त्री पुरुषांना समानता अशा विविध तरतुदी केल्या आहेत.

आज मुक्त आर्थिक धोरणांच्या माध्यमातून कामगार कपात, स्वेच्छानिवृत्ती, कमी वेतन देवून कामगारांचे शोषण केले जात आहे. त्यामुळे डॉ. आंबेडकर प्रणित कामगार कल्याणाचे तत्व अंमलात आणणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

## ४) राज्य समाजवाद

भारताच्या आर्थिक उन्नतीसाठी दारिद्र्य व विषमता निर्मूलन आणि बहुजन समाजाची शोषण मुक्तता यावर भर दिला पाहिजे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते, त्याकरिता डॉ. आंबेडकरांनी राज्य समाजवादाचा स्वीकार केला. डॉ. आंबेडकरांना समाजवाद हवा होता परंतु पारंपारिक समाजवाद त्यांना मान्य नव्हता. राज्यघटनेतच समाजवादाची तरतूद असावी. त्यांच्या दृष्टिकोनातून श्रमिक आणि शोषित वर्गाच्या आर्थिक सुरक्षेकडे अधिक लक्ष देऊन योजना तयार करायला पाहिजे. नैतिक प्रेरणा लोकांमध्ये असायला पाहिजे आणि

त्यांनी मिळून जे काही आपल्या श्रमाने कमविले ती सर्व संपत्ती समान रूपात वाटली पाहिजे. डॉ. आंबेडकरांना बुद्धाचा समाजवाद अधिक महत्त्वाचा वाटत होता.

डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधान सभेला मार्च 1947 मध्ये 'राज्ये आणि अल्पसंख्याक' या शीर्षकाखाली एक निवेदन दिले होते. या निवेदनात मूळ अधिकार, अल्पसंख्यांकाचे अधिकार आणि अनुसूचित जातींच्या सुरक्षा उपायांची कशी तरतूद असावी हे स्पष्ट केले आहे.

डॉ. आंबेडकरांनी संविधान सभेला सादर केलेले निवेदन हे राज्य समाजवादाचे प्रारूप होते. संविधानाच्या उद्देशिकेत आणि निर्देशित तत्वात डॉ. आंबेडकरांनी राज्य समाजवादाचा समावेश केलेला आहे. डॉ. आंबेडकरांच्या राज्य समाजवादाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती -

1) शोषणमुक्त समाजव्यवस्था निर्माण करणे.
2) जाती व वर्गविहीन, स्त्री पुरुष समानतेवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करणे.
3) दुर्बल घटकांचे संरक्षण आणि त्यांच्या कल्याणाची जबाबदारी सरकारवर टाकणे.
4) साधनसंपत्तीचे समान वाटप
5) नियोजनबद्ध अर्थव्यवस्था निर्माण करणे
6) शासनाचा अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप
7) मुलभूत उद्योगाचे राष्ट्रीयीकरण
8) शेतीचे राष्ट्रीयीकरण
9) जाती, धर्म, पंथ, लिंग व भेदभाव विरहित समाजव्यवस्था निर्माण करणे.[24]

सरकारने स्वीकारलेले मुक्त आर्थिक धोरण हे डॉ. आंबेडकरांच्या राज्य समाजवादाच्या अगदी विपरित आहे. डॉ. आंबेडकरांनी सरकारचा हस्तक्षेप आवश्यक असल्याचे सांगितले परंतु सरकारच आपले अस्तित्व टिकविण्यात अपयशी ठरले आहे. डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीचा मार्ग आहे. परंतु सरकारने मुक्त धोरणाचा

अवलंब केल्याने देशातील 30% जनतेला उपाशीपोटी जीवन जगावे लागत आहे.

डॉ. आंबेडकरांच्या राज्य समाजवादाची मुक्त आर्थिक धोरणाशी तुलना केल्यास राज्य समाजवाद हाच सर्वंकष स्थिर आणि कायम कल्याणाचा मार्ग दिसून येतो. त्याची तुलना खालीलप्रमाणे -

1) राज्य समाजवादात आर्थिक कार्यक्रमाचा केंद्रबिंदू शासन आहे. तर मुक्त आर्थिक धोरणात शासनाचा हस्तक्षेप अमान्य करण्यात आला आहे. त्यामुळे सरकारी उपक्रमांची विक्री मातीमोल किंमतीला होत आहे.

2) राज्य समाजवाद लोकशाहीचा पुरस्कार करतो तर मुक्त आर्थिक धोरण हे भांडवलशाहीला बळ देणारे आहे त्यामुळे बहुसंख्य समाज हालअपेष्टात लोळत आहे.

3) राज्य समाजवाद राष्ट्रीयीकरणावर भर देतो. मुक्त आर्थिक धोरण खाजगीकरणावर भर देणारे आहे.

4) राज्य समाजवाद श्रमिक, भूमीहिन, शेतमजूर, कुळ आणि भुदासांचे संरक्षण करणारे आहे. परंतु मुक्त आर्थिक धोरणात खाजगीकरणावर भर असल्या कारणाने उच्चवर्गीय लोकांवर भर देणार आहे. त्यांच्याच उन्नतीकरिता विविध धोरणांची आखणी केलेली आहे.

5) डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय तत्वावर आधारित आहे. मुक्त आर्थिक धोरण मात्र ही तत्वे मान्य करीत नाही तो विषमतेला पोषक आहे. त्यात भांडवलदारांचेच स्वातंत्र्य आणि न्याय तत्व मान्य केले गेले आहे. सामान्य जनतेचा त्यात विचार नाही.

6) राज्य समाजवादाने शेती, विमा, शिक्षणाला महत्त्व दिले आहे. मुक्त धोरण मात्र खाजगी औद्योगिकरणाला महत्त्व देतो ज्यात बहुसंख्य लोक फक्त तात्पुरते कामगार असतात.

7) राज्य समाजवाद प्रत्येकाला काम देण्याचे सांगतो तर मुक्त धोरणात मात्र कामगार कपातीवरच जास्त भर असून यांत्रिकीकरण करून जास्तीत जास्त उत्पादन करणे ह्याच तत्वावर काम करतो आहे.

8) राज्य समाजवाद म्हणजे कल्याणकारी राज्याची संकल्पना या आर्थिक सिद्धांतामुळे मानवी हक्काच्या संरक्षणाची हमी, जाती, वर्ण, रंग, धर्म, गरीब, श्रीमंत, गुलाम, मालक या कोणत्याही गोष्टीचा भेदभाव नाही. परंतु मुक्त धोरणाच्या माध्यमातून या सर्व गोष्टींना महत्त्व देण्यात येत आहे. आज मोठ्या प्रमाणात जाती दंगलीचे प्रकरण निर्माण होत आहेत त्याला मुक्त आर्थिक धोरणच जबाबदार आहे.[25]

9) राज्य समाजवाद संविधानानुसार कार्य करते परंतु मुक्त आर्थिक धोरणाने संविधानाला नेहमीच तुडविले आहे. त्यामुळेच आता उच्चवर्णीय आणि भांडवलदार संविधान बदलविण्याचा घोषणा देत आहेत.

राज्य समाजवाद आणि मुक्त आर्थिक धोरण एकमेकांच्या पूर्ण विरोधी बाजू आहेत. राज्य समाजवाद बुडवायचा असेल तर जागतिकीकरण स्वीकारावे लागेल आणि जागतिकीकरणावर आळा घालायचा असेल तर केवळ राज्य समाजवाद हा एकच मार्ग उरतो.

भांडवलशाही ही पुर्णत% घटनाबाह्य आहे. म्हणून अपगुंतवणूक मंत्री हे पद सुद्धा घटनाबाह्यच आहे आणि सामाजिक हिताचा घात करणारे आहे. याचा अतिशय विपरित परिणाम शेतकरी, शेतमजूर, अल्पसंख्यांक, शोषित या सर्वांवर होणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शोषण मुक्त समाजव्यवस्थेचे व अर्थव्यवस्थेचे खंदे पुरस्कर्ते होते. आजचे मुक्त आर्थिक धोरण डॉ. आंबेडकरांच्या विचाराशी अगदी विपरित आहे. त्यामुळे राज्य समाजवादाचे पुर्नजीवन करणे अत्यंत आवश्यक होऊन बसले आहे.

## संदर्भ


1. डॉ. नरेंद्र जाधव, डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान, सुगावा प्रकाशन पुणे, १९९२. पृ. 1
2. तत्रैव पृ. 5
3. ॲड. दिलीप डी. काकडे, मिश्र अर्थव्यवस्थेकडून मुक्त अर्थव्यवस्थेकडे, प्रकाशक बी.डी. काकडे 2003 पृ. 7
4. तत्रैव पृ. 22
5. ॲड. दिलीप डी. काकडे, मुक्त अर्थव्यवस्थेत बहुजन समाजाचे भवितव्य, टेहळणी प्रकाशन, पुणे 2003 पृ. 1
6. तत्रैव पृ. 61
7. तत्रैव पृ. 63
8. जैमिनि कळू, मुखपत्र श्रमीक उर्जा, सेझ नावाचा राक्षस आहे तरी कसा, प्रकाशन 2007 पृ. 277
9. काकासाहेब गडकरी, एल.पी.जी., सत्यम प्रकाशन यवतमाळ 2006 पृ. 5
10. ॲड. दिलीप डी. काकडे, मुक्त अर्थव्यवस्थेत बहुजन समाजाचे भवितव्य, टेहळणी प्रकाशन, पुणे 2003 पृ. 66
11. काकासाहेब गडकरी, एल.पी.जी., सत्यम प्रकाशन यवतमाळ 2006 पृ. ९
12. सुलभा ब्रम्हे, मुखपत्र श्रमीक उर्जा, पाणी पुरवठा व आरोग्य सेवेचे खाजगिकरण, प्रकाशन 2007 पृ. 2९5
13. उत्तम कांबळे, जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न, सुगावा प्रकाशन पुणे, २००२. पृ. 13
14. काकासाहेब गडकरी, एल.पी.जी., सत्यम प्रकाशन यवतमाळ 2006 पृ. 7
15. ॲड. दिलीप डी. काकडे, डॉ. आंबेडकर आणि नवीन आर्थिक धोरण, प्रकाशक बी.डी. काकडे 2003 पृ. 51
16. काकासाहेब गडकरी, एल.पी.जी., सत्यम प्रकाशन यवतमाळ 2006 पृ. 13
17. ॲड. दिलीप डी. काकडे, डॉ. आंबेडकर आणि नवीन आर्थिक धोरण, प्रकाशक बी.डी. काकडे 2003 पृ. 34
18. तत्रैव पृ. 35

19. दिपक मेश्राम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत आर्थिक विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९७–९८. पृ. 4
20. पुरूशोत्तम लांडगे, डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवाद आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अध्ययन, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, २००१–०२. पृ. ८2
21. तत्रैव पृ. 7९
22. दिपक मेश्राम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत आर्थिक विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९७–९८. पृ. 45
23. कु. चंदा सोमकुवर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे श्रमीक कल्याण विषयक विचार, लघुशोध प्रबंध, डॉ. आंबेडकर विचारधारा, १९९०–९१. पृ.26
24. ॲड. दिलीप डी. काकडे, डॉ. आंबेडकर आणि नवीन आर्थिक धोरण, प्रकाशक बी.डी. काकडे 2003 पृ. 41
25. तत्रैव पृ. 43



## लेखक परिचय

नाव : प्रा. डॉ. रक्षित मदन बागडे

शिक्षण : एम. ए. (अर्थशास्त्र), एम. फिल. (अर्थशास्त्र),
पीएच. डी. (अर्थशास्त्र)
नेट – जे.आर.एफ. (अर्थशास्त्र) (दोन वेळा),
एम. ए. आंबेडकर विचारधारा (पाच सुवर्ण पदके)
एम. ए. (समाजशास्त्र)

कार्य : सन 2010 पासुन अर्थशास्त्र विषयाचे अध्यापनाचे कार्य सुरू. आंतरराष्ट्रीय स्तरावरील 2 परिषदांवर शोधनिबंधाचे लेखन आणि वाचन. राष्ट्रिय स्तरावरील 8 परिषदांमध्ये सहभाग आणि 3 परिषदामध्ये शोधनिबंधाचे लेखन आणि वाचन.

**लोटस ॲण्ड कोब्रा पब्लिशिंग हाऊस**
द्वारा अश्वजीत पाटील,
425, न्यु खदान, लष्करीबाग, नागपुर – 17.
मो. 9096924808, 9405238458
email : lotusandcobraph@gmail.com

ISBN-978-93-87250-26-0

मूल्य : 110/-